



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ८४ * नांदेड * सोमवार, दि. ३० मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## अशोक खरात प्रकरणात चाकणकरांना समन्स



**नाशिक (प्रतिनिधी)** – भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी महिला प्रदेशाध्यक्षा आणि राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांना समन्स बजावल्याची सूत्रांची माहिती समोर आली आहे.

खरात यांच्या 'श्री शिवनिका संस्थान'मध्ये विश्वस्त म्हणून काम करणाऱ्या चाकणकर यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही महिला नेत्यांनी चाकणकर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. यामुळे चाकणकर यांना प्रथम महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.

सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणाचा तपास करणारे विशेष तपास पथक (एसआयटी) आता शिवनिका संस्थानच्या सर्व आजी-माजी सदस्यांची चौकशी करणार आहे. संस्थेच्या सर्व व्यवहार, आर्थिक उलाढाली आणि निर्णयप्रक्रिया एसआयटीच्या रडारवर आल्या आहेत. चाकणकर यांच्यासह अन्य विश्वस्तांनाही चौकशीसाठी बोलावण्यात येणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

खरात यांच्या फार्महाऊस आणि कार्यालयात लपविलेले कॅमेरे, महिलांचे अश्लील व्हीडीओ आणि अनेक महिलांचा कथित शोषणाचा प्रकार उघडकीस आल्यानंतर प्रकरण चांगलेच तापले आहे. चाकणकर यांचे खरातसोबतचे फोटो आणि व्हीडीओ व्हायरल झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

एसआयटी आता संपूर्ण साखळी उलगडण्याचा प्रयत्न करत आहे. शिवनिका संस्थानशी संबंधित प्रत्येक व्यक्तीची भूमिका तपासली जाणार असून, चाकणकर यांचीही प्रत्यक्ष चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### नराधम अशोक खरातला १ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणातील तपासात नवनवीन धक्कादायक माहिती समोर येत आहे. नाशिक जिल्हा न्यायालयाने आज या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपी अशोक खरात याच्या पोलीस कोठडीत १ एप्रिलपर्यंत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. महिलांवरील अत्याचार आणि आर्थिक फसवणुकीचे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या खरातचा तपास करण्यासाठी एसआयटीला अधिक कालावधीची गरज असल्याचे न्यायालयाने मान्य केले आहे.

रविवारी सकाळी ११:३० वाजता अशोक खरातला कडक पोलीस बंदोबस्तात न्यायमूर्ती श्रीमती एम. व्ही. भराडे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी एसआयटीचे तपासी अधिकारी किरण सूर्यवंशी आणि सरकारी वकील शैलेंद्र बागडे यांनी खरातच्या तीन दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली.

### मुंबई सायबर पोलिसांची नांदेडमध्ये कारवाई

## 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली ३२ लाखांना गंडविणाऱ्या चार जणांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील चार युवकांनी संगणमत करून मुंबईच्या एका तरुणीला डिजिटल अरेस्टच्या नावाखाली ३२ लाखांना गंडविले होते. मुंबई पोलिसांच्या विशेष पथकाने शनिवार, दि. २८ मार्च रोजी नांदेडमधून या चार तरुणांना अटक केली. या चार जणांनी दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगत चार दिवस सदर तरुणीला घरातच बंदिस्त केले होते. विशेष म्हणजे या चारही तरुणांचा सायबर गुन्ह्यात सक्रिय सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक केलेल्या तरुणांमध्ये तिघे इतवारा भागातील तर एक जण सिडकोतील रहिवासी आहे.

मुंबईतील गोरेगाव पूर्व येथे राहणाऱ्या एका २१ वर्षे तरुणीला व्हॉट्सअप व्हीडीओ कॉल करून मुंबई पोलीस दलातील सब इन्स्पेक्टर अरुण कुमार बोलत असल्याचे सांगितले. मुंबई पोलिसांनी पहेलगाम हल्ल्यातील दहशतवादी अफजल खान याला अटक केली आहे. त्याच्याकडे तुमच्या आजीच्या नावाचे सिम कार्ड सापडले आहे. या सिम कार्डवरून देशाची गोपनीय माहिती शत्रू राष्ट्राला पुरविण्यात आली आहे असे त्यांनी फोनवरून सदर तरुणाला सांगितले.

घाबरलेल्या कुटुंबाचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी हा कॉल मुंबई एटीएसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ट्रान्सफर केल्याचेही सांगितले. या सर्व प्रकारादरम्यान त्यांनी पोलीस गणवेशही परिधान केला होता. त्यांच्यामागे दहशतवाद विरोधी पथक मुंबई असा फलकही लावण्यात आला होता. तुमचा दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगत या तरुणांनी त्या तरुणीला आणि तिच्या कुटुंबियांना आरटीई नावाचे ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्यांना तीन ते चार दिवस घराबाहेर पडू दिले नाही. ते डिजिटल अरेस्ट असल्याचे सांगितले जाते. त्याचवेळी तरुणीच्या नावाखाली तुमची बँक खाते सुरक्षित आहेत की नाही हे तपासण्यासाठी खात्यातील पैसे आरबीआय प्रतिनिधीच्या खात्यावर पाठवावे लागतील आणि तपासल्यानंतर ते परत केले जातील असे खोटे आश्वासन देऊन आरोपींनी फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने ३२ लाख ६९ हजार ९९७ रुपये उकळले. विशेष म्हणजे आरोपींनी ठरवलेला बनावट एफआयआर, अटक वॉरंट आणि इमिडीटी सर्टिफिकेट देखील पाठवले होते. हा सर्व प्रकार फेब्रुवारी महिन्यात घडला होता. सदर तरुणीचे वडील जर्मनीत होते. जर्मनीतून परत येताच त्यांनी पोलिसांना सर्व प्रकार सांगितला. मुंबई पोलिसांनी केलेल्या सर्व तपास तांत्रिक बाबी आधारे तरुणीची फसवणूक करणारे आरोपी हे नांदेडचे असल्याचे स्पष्ट झाले.

आरोपींमध्ये निलेश प्रभाकर वासमकर (वय २५ राहणार साईनगर सिडको), शुभम संजय जोगदंड (वय २५ राहणार शक्तीनगर), अजय देविदास भोसले (वय २५ राहणार लोहार गल्ली इतवारा) आणि सिद्धांत दिलीप जोंधळे (वय १९ शक्तीनगर, नांदेड) या चौघांना मुंबई सायबर पोलिसांनी शनिवारी अटक केली. अटकेच्या कारवाईवेळी नांदेड पोलीस दलाचीही मदत घेण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबई सायबर पोलिसांना मदत केली.



**नांदेड** – शिवसेना आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आ. हेमंत पाटील, आ. बालाजी कल्याणकर यांच्यासह अनेक मान्यवर दिसत आहेत. **(छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)**

## ट्रम्पविरोधात ५० राज्यांत एकाचवेळी ३३०० ठिकाणी लाखो नागरिक रस्त्यावर

**वॉशिंटन (वृत्तसंस्था)** – आम्हाला राजा नको, लोकशाही हवी! या गर्जनेने सध्या संपूर्ण अमेरिका हादरून गेली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील 'हुकूमशाही' निर्णयांविरुद्ध आणि इराणसोबतच्या युद्धाला महिना पूर्ण झाल्याच्या निषेधार्थ अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठे 'नो किंग्स' आंदोलन पुकारण्यात आले. ५० राज्यांतील ३३०० शहरांमध्ये लाखो नागरिक रस्त्यावर उतरले असून, ट्रम्प प्रशासनाच्या पायाखालची वाळू सरकली.

या वेळच्या आंदोलनाचे मुख्य केंद्र मिनेसोटा राज्यातील 'मिनियापोलिस-सेंट पॉल' हे क्षेत्र बनले. डिसेंबरमध्ये ट्रम्प यांनी राबवलेल्या 'ऑपरेशन मेट्रो सर्ज' अंतर्गत ३००० फेडरल एजंट्सनी सामान्य नागरिकांवर अमानुष बळाचा वापर केला होता. यात 'ॲलेक्स प्रेटी' आणि 'रेनी निकोल गुड' या दोन निष्पाप अमेरिकन नागरिकांची हत्या करण्यात आली होती. हा जाब विचारण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मिनेसोटामध्ये जनसागराचा महापूर लोटला.

केवळ सामान्य जनताच नाही, तर अमेरिकेतील दिग्गज कलाकार आणि नेतेही या आंदोलनात हिरिरीने सहभागी झाले आहेत. रॉबर्ट डी निरो: प्रसिद्ध अभिनेते डी निरो यांनी निदर्शकांचे कौतुक करताना ट्रम्प प्रशासनाच्या एजंट्सना 'सरकारी गुंड' संबोधले. तुम्ही या सशस्त्र गुंडांच्या हल्ल्याचा धैर्याने सामना (पान ३ वर...)

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नांदेड विमानतळावर स्वागत

**नांदेड (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे रविवारी नांदेड विमानतळावर आगमन झाले. यावेळी बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील आदी मान्यवरांनी त्यांचे पुस्तक व पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.



पुढील नियोजित कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेड विमानतळावरून प्रयाण केले.

## राज्यात पुन्हा अवकाळीचे संकट

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यभरात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचं संकट घोंगावणार असल्याची शक्यता आहे. ३० मार्चपासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. तर उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो. असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविला आहे.

दरम्यान, ३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो. त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे.

त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संभाव्य परिस्थिती बघता शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी.


## सरकारी जागेवर १५०० चौरस फुटांपर्यंतचे अतिक्रमण अधिकृत करण्याचा सरकारचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, सरकारी जागेवर १५०० चौ.फुटांपर्यंत असलेले अतिक्रमण नियमबद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. २०११ पूर्वीची सरकारी जागेवरील १५०० चौरस फुटापर्यंतची अतिक्रमणे नियमानुकूल होणार आहेत.

निवडणुकीत दिलेल्या वचनानुसार, राज्यातील जनतेला त्यांच्या हक्काचे घर मिळावे व घरबांधणीसाठी प्लॉट उपलब्ध व्हावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेमुळे सुमारे १५ लाख कुटुंबांना लाभ होणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर मिळत होते, मात्र आता सर्वसामान्य नागरिकांसाठी पट्टेवाटपाचा निर्णय घेतला असून, पट्टा मिळाल्यानंतर केवळ १००० रुपयांत नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याची सोयही सरकारने केली असल्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

## मुंबईचा सर्वात मोठा पाठलाग, कोलकाताला ६ विकेट्सने हरवले

**मुंबई (प्रतिनिधी)** –मुंबई इंडियन्सने आपल्या कारकिर्दीतील सर्वात यशस्वी धावांचा पाठलाग पूर्ण करत १३ वर्षांनंतर आपला पहिला आयपीएल सामना जिंकला. रविवारी वानखेडे स्टेडियमवर संघाने कोलकाता नाईट रायडर्सला ६ गडी राखून पराभूत केले. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना केकेआरने ४ गडी गमावून २२० धावा केल्या. एमआयने १९.१ षटकांत ४ गडी गमावून हे लक्ष्य पूर्ण केले. (सविस्तर वृत्त पान ५ वर)




## गॅस सिलिंडरसाठीच्या रांगेतच माजी सरपंचाचा मृत्यू

**जळगाव (प्रतिनिधी)** – अकोल्यात गॅस सिलिंडरच्या रांगेत एका वृद्धाला आपला जीव गमावावा लागला आहे. त्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी सरकार आणि सत्ताधारी पक्षाच्या आमदारांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

अकोल्यातील अन्वी मिर्झापूरचे माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांना काल यदुराज गॅस एजन्सीसमोर सिलिंडरसाठी रांगेत उभे असताना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यावरून सिलिंडर बुक करा, २५ दिवसात येईल असं वर तोंड करून सांगणाऱ्या आमदार मॅडमने शिरसाट कुटुंबीयांची सर्वात आधी माफी मागायला हवी असे रोहिणी खडसे यांनी भाजप आमदार चित्रा वाघ यांना त्यांचे नाव न घेता सुनावले आहे. तसेच जे लोक सांगतात ना की राज्यात मुबलक गॅस सिलिंडर आहेत. त्यांना जरा हा फोटो दाखवा ! असंही रोहिणी



खडसे संतापून म्हणाल्या आहेत.

दरम्यान काही दिवसांपूर्वी विधिमंडळ परिसरात काँग्रेस पक्षाचे आमदार आंदोलन करत असताना २५ दिवसांत गॅस सिलिंडर मिळतो, गॅस बुक करा असे विधान भाजप आमदार चित्रा वाघ यांनी सांगितले होते. त्यावरून रोहिणी खडसे यांनी त्यांच्यावरती नाव न घेता टीका केली आहे. रोहिणी खडसेंनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलंय की, जे लोक सांगतात ना की राज्यात मुबलक गॅस सिलिंडर आहेत. त्यांना जरा हा फोटो दाखवा ! अकोल्यातील अन्वी मिर्झापूरचे माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांना काल यदुराज गॅस एजन्सीसमोर सिलिंडरसाठी रांगेत उभे असताना आपला जीव गमवावा लागला आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# संपूर्ण भारत 'गॅस'वर

इराण-इजराइल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक स्तरावर अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या युद्धाचे पडसाद केवळ त्या दोन देशांपुरते मर्यादित न राहता जगभरातील अर्थव्यवस्था, पुरवठा साखळी आणि इंधन दरांवर उमटताना दिसत आहेत. भारतासारख्या आयात-आधारित देशावर याचा परिणाम होणे साहजिकच आहे. परंतु या परिस्थितीपेक्षा अधिक चिंताजनक बाब म्हणजे समाजात निर्माण झालेली भीती आणि त्यातून वाढलेली साठेबाजीची प्रवृत्ती. सध्या अनेक ठिकाणी स्वयंपाकाचा गॅस, डिझेल आणि पेट्रोल यांची टंचाई असल्याच्या अफवा पसरत आहेत. परिणामी, लोक गरज नसतानाही या वस्तूंचा साठा करण्यासाठी धाव घेत आहेत. पेट्रोल पंपांवर वाढलेली गर्दी, गॅस सिलिंडरची अनावश्यक बुकिंग आणि इंधनाचा साठा करण्याचे प्रकार हे याचे स्पष्ट उदाहरण आहे. ही मानसिकता केवळ अविवेकीच नाही, तर सामाजिकदृष्ट्याही घातक आहे. ही सर्व कृत्रिम परिस्थिती पाहता सध्या संपूर्ण भारत 'गॅस'वर आहे की काय असे वाटू लागले आहे. प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे की, देशात इंधन आणि गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. पुरवठा सुरळीत सुरू असून, कोणतीही तातडीची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाही. तरीही लोक अफवांवर विश्वास ठेवून साठेबाजी करीत असतील, तर ते प्रशासनावरील अविश्वासाचे द्योतक आहे. काही लोक टाक्यांमध्ये पाणी भरावे त्याप्रमाणे डिझेल भरून नेत आहेत, हे पूर्णपणे मूर्खपणाचे आहे. अशा वर्तनामुळे कृत्रिम टंचाई निर्माण होते आणि खरी गरज असलेल्या नागरिकांना आवश्यक वस्तू वेळेवर मिळत नाहीत. साठेबाजीची ही वृत्ती समाजातील लोभ आणि असंवेदनशीलतेचे दर्शन घडवते. प्रत्येकाने 'माझे आधी' या स्वार्थी विचारातून बाहेर पडून 'आपले सर्वांचे' या भावनेने विचार करण्याची गरज आहे. कारण संकटाच्या काळात समाजातील एकात्मता आणि परस्पर सहकार्य हेच सर्वात मोठे बळ ठरते. जर प्रत्येकजण स्वतःच्या सुरक्षिततेसाठी जादा साठा करेल, तर त्याचा फटका दुर्बल आणि गरजू घटकांना बसतो. या पार्श्वभूमीवर शासनाची भूमिकाही महत्त्वाची ठरते. साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी कठोर नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आवश्यक वस्तूंच्या खरेदीवर मर्यादा घालणे, साठेबाजांवर कारवाई करणे आणि पुरवठा व्यवस्थेवर सतत लक्ष ठेवणे ही शासनाची जबाबदारी आहे. त्याचबरोबर, जनतेमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी पारदर्शक आणि वेळोवेळी माहिती देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. माध्यमांची भूमिकाही येथे निर्णायक ठरते. अफवा आणि अर्धवट माहिती पसरवण्याऐवजी जबाबदारीने बातम्या देणे, जनतेला योग्य माहिती पुरवणे आणि संयम राखण्याचे आवाहन करणे हे माध्यमांचे कर्तव्य आहे. समाजमाध्यमांवरून पसरत असलेल्या अपप्रचाराला आळा घालण्यासाठीही सजगता आवश्यक आहे. युद्ध हा नक्कीच गंभीर विषय आहे; परंतु त्याचा अनावश्यक बाऊ करणे आणि भीतीचे वातावरण निर्माण करणे योग्य नाही. अशा वेळी नागरिकांनी शांतता, संयम आणि विवेक दाखवणे अपेक्षित आहे. गरजेपुरतेच खरेदी करणे, इंधनाचा काटकसरीने वापर करणे आणि इतरांच्या गरजांची जाणीव ठेवणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. आजच्या परिस्थितीत 'काटकसर' ही केवळ आर्थिक गरज नाही, तर सामाजिक मूल्य आहे. अनावश्यक वापर टाळून संसाधनांचा योग्य वापर केल्यास आपण केवळ स्वतःलाच नव्हे, तर समाजालाही मदत करू शकतो. ऊर्जा बचत, पर्यायी साधनांचा वापर आणि जबाबदार उपभोग या गोष्टींचा अवलंब केल्यास अशा संकटांना अधिक सक्षमपणे सामोरे जाता येईल. शेवटी कोणतेही युद्ध हे केवळ रणांगणापुरते मर्यादित नसते; त्याचे परिणाम जगभरातील सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचतात. मात्र, या परिणामांची तीव्रता आपण आपल्या वर्तनातून कमी किंवा जास्त करू शकतो. भीती आणि लोभ यांना बळी पडण्याऐवजी संयम, सहकार्य आणि जबाबदारीची भूमिका स्वीकारणे हीच खरी काळाची गरज आहे. समाजाने एकजुटीने आणि समजुतीने वागल्यास कोणतेही संकट मोठे राहत नाही. म्हणूनच अफवांना बळी न पडता, साठेबाजी टाळून आणि संसाधनांचा योग्य वापर करून आपण या परिस्थितीचा सामना करायला हवा. युद्धाचे सावट जरी दूरवर असले, तरी त्याचा परिणाम आपल्या मनावर होऊ देऊ नये, हीच खरी शहाणपणाची भूमिका ठरेल.

# डिजिटल प्रशासनाची नवी दिशा : नांदेड पोलीस परिक्षेत्राचा राज्यात अव्वल ठसा




**शनिवार, दि. २८ मार्च रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे.**

महाराष्ट्र शासनाने प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने राबविलेला १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम हा राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या उपक्रमात नांदेड पोलीस परिक्षेत्राने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत केवळ यश मिळवले नाही, तर आधुनिक प्रशासनाचा एक आदर्श नमुना निर्माण केला आहे.

मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मूल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यातील सर्व परिक्षेत्रांत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. याबाबत शनिवार, दि. २८ मार्च रोजी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झालेल्या बक्षीस वितरण समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे.

आजच्या डिजिटल युगात प्रशासनाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, सेवा अधिक जलद, अचूक आणि सुलभ पद्धतीने मिळाव्यात ही काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या नेतृत्त्वाखाली नांदेड परिक्षेत्राने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणले.

ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये संकेतस्थळाचे आधुनिकी-करण हा एक महत्त्वाचा भाग ठरला. नव्याने विकसित केलेले संकेतस्थळ अधिक सुरक्षित, सुलभ आणि नागरिकाभिमुख बनविण्यात आले. विविध शासकीय योजना व सेवा एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आल्या, ज्यामुळे नागरिकांना कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी झाली.

'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यावर विशेष भर देण्यात आला. तक्रार नोंदणीपासून ते तिच्या निकाली काढण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करण्यात आली. यामुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला.

ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करून कागदविरहित कामकाजाला चालना देण्यात आली. फाईल निपटारा जलद गतीने होऊ लागला, तसेच निर्णयप्रक्रियेत विलंब कमी झाला. इंटरॅक्टिव्ह डॅशबोर्डच्या माध्यमातून अद्ययावत व अचूक माहिती उपलब्ध करून देण्यात आली, ज्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कामकाजावर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य झाले.

नांदेड परिक्षेत्राची खासियत म्हणजे केवळ पारंपरिक सुधारणा न करता नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. 'संवेदना' ही कृत्रिम बुद्धिमत्ता (I) आधारित संगणकीय प्रणाली अर्ज चौकशीसाठी सुरू करण्यात आली, ज्यामुळे नागरिकांना तत्काळ माहिती मिळू लागली. "Eagle Eye' प्रणालीद्वारे गुन्हे तपासावर बारकाईने लक्ष ठेवता येऊ लागले, तर 'खबर' हेल्पलाईनमुळे गैरप्रकार आणि अवैध व्यवसायांविरोधात नागरिकांना थेट तक्रार नोंदविण्याचे सशक्त माध्यम मिळाले. याशिवाय तक्रारदारांच्या समाधानाची पातळी जाणून घेण्यासाठी फीडबॅक प्रणाली सुरू करण्यात आली, हीदेखील एक महत्त्वपूर्ण पायरी ठरली. यामुळे सेवांची गुणवत्ता सातत्याने सुधारण्यास मदत झाली.

या सर्व उपक्रमांमुळे प्रशासन अधिक उत्तरदायी, पारदर्शक आणि कार्यक्षम बनले आहे. नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया सुलभ झाल्यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील दरी कमी झाली आहे. डिजिटल माध्यमातून संवाद वाढल्यामुळे प्रशासन अधिक विश्वासार्ह बनले आहे. या यशामागे सक्षम नेतृत्वासोबतच संघभावना आणि सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरले. पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन कर्मचारी तसेच तांत्रिक तज्ज्ञ यांच्या समन्वयातून हा बदल शक्य झाला. सॉफ्टवेअर अभियंत्यांनी विकसित केलेल्या प्रणालींमुळे प्रशासनाच्या डिजिटल परिवर्तनाला गती मिळाली.

यापूर्वी १०० दिवसांच्या कृती आराखड्यात नांदेड परिक्षेत्राने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला होता. त्यामुळे सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्याची परंपरा या परिक्षेत्राने जपली आहे. १५० दिवसीय कार्यक्रमात मिळालेला प्रथम क्रमांकही त्या प्रवासातील महत्त्वाची पायरी आहे.

नांदेड पोलीस परिक्षेत्राची ही यशोगाथा इतर शासकीय विभागांसाठी प्रेरणादायी ठरावी, अशी अपेक्षा आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रभावी नियोजन आणि नागरिककेंद्रित दृष्टीकोन यांच्या मदतीने प्रशासन अधिक सक्षमकसे होऊ शकते याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

भविष्यात अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि जनतेच्या अपेक्षांना पूरक ठरेल यात शंका नाही. नांदेड परिक्षेत्राने घालून दिलेला हा आदर्श राज्याच्या डिजिटल प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरणारा आहे.

**-अलका पाटील**
उपसंपादक
जिल्हा माहिती कार्यालय,
नांदेड

# परीसाचीय संगे, लोहाचे होई सुवर्ण!

एके दिवशी रस्त्यावर एक माणूस मला अस्वस्थपणे काहीतरी शोधत असल्याचे दिसले. मी त्याला विचारल्यावर त्याने मला सांगितले की, तो परिसाच्या शोधात असून, त्याच्याकडील लोखंडाचे त्याला सुवर्ण करायचे आहे. इथे मला प्रश्न पडला की, परीस खरंच असा रस्त्यावर सापडेल का? परीसासारखी अमूल्य गोष्ट इतकी स्वस्त आहे का? आपण नेहमी ऐकत असतो की,

परीसाचीय संगे,
लोहाचे होई सुवर्ण

याचा अर्थ परीसाच्या सानिध्यात आल्यावर, लोखंडाचे सोने होते. मग नेमकी हीच बाब लक्षात घेतली तर, आपण तर मनुष्य आहोत व आपणही जीवनात अनेकांच्या सानिध्यात येत असतो. मग आपल्या जीवनास सुवर्ण बनवण्यासाठी आपण कुणाच्या संगतीत राहतो किंवा आपला परीस कोण आहे, यावर आपल्या जीवनाची वाटचाल सुखी किंवा दुःखी होऊ शकते. किंबहुना आपले आयुष्य सुवर्ण बनू शकते. आपल्यावर संगतीचा परिणाम मोठ्या प्रमाणात होतो. चंदनाच्या सुवासाने जसा भवताल दरवळून जातो, अगदी तसेच चांगल्या व्यक्तीच्या संगतीने माणसाचे जीवन दरवळून जाते. दुधात साखर मिसळल्यावर जसे ते गोड लागते, तसेच जीवनरूपी दुधात, सकारात्मक विचार रुपी संगतीची साखर मिसळल्यावर जीवनरूपी चहा गोड होतो. मनुष्याच्या हातात आहे, की त्याने चांगल्याची का वाईटाची संगत घ्यावी. भोगी माणसाच्या संगतीमध्ये माणूस भोगी व योग्याच्या संगतीत माणूस योगी बनतो.

अग्नीच्या जवळ गेल्यावर शरीराला त्रास होतो, पण फुलांच्या जवळ गेल्यावर शरीरसुद्धा सुगंध देते. आदर्श महापुरुष घडण्यामागचे एक कारण म्हणजे त्यांना सत् किंवा सत्याची संगत लाभली. सत्याची संगत लाभली की, असत्याची बेडी गळून पडते व मनोवृत्तीत बदल होऊन स्वच्या वैचारिक प्रगतीचा मार्ग मोकळा होतो. असे म्हणतात की,

ढवळ्या शेजारी,
पवळ्या बांधला,
वान नाही पण,
गुण लागला

याप्रमाणे नक्कीच, कुणाच्याही संगतीत राहा, त्याचा गुण आपणास लागणारच. चांगल्याच संगतीत राहिलो तर आयुष्याचे गणित सहज सोडवता येईल, पण वाईट व्यक्तीच्या संगतीमध्ये, वाईट सोबतीमध्ये, एकदा जीवनाची बेडी आडकली की मग सुटका नाही. संगतीचा परिणाम हा झाल्याशिवाय राहत नाही. एकाच माणसाचे दोन पोपट त्याने एक साधूच्या संगतीमध्ये व दुसऱ्यास वाईट वृत्ती असलेल्या माणसाच्या संगतीमध्ये ठेवल्यावर, जेव्हा काही दिवसांनी तो माणूस दोन्ही घरी जातो, तेव्हा साधूच्या संगतीमधील पोपट साधूचे नम्रपणे स्वागत करतो तर दुसरा पोपट साधूला शिव्या घालतो. यावरून संगतीचा लाभ लक्षात येतो.

इंग्रजीत म्हटल्याप्रमाणे,

Mind has its own place, can make a heaven of hell or a hell of heaven. याचा अर्थ असा की, केवळ आपल्या मनावर किंवा आपल्या 'स्व'वर हे अवलंबून आहे की, आपल्या जीवनाचा स्वर्ग करायचे का नर्क व यास चांगल्या व वाईट संगतीचा परिणाम प्रभाव टाकतो. इतिहास आपणास अनेक दाखले देत आणखी आपले भविष्य सुधारण्यासाठी उभा आहे. अर्जुन, कृष्णाचा सखा, सोबती होता व त्याच्या सानिध्यात अर्जुनाच्या जीवनाचे सुवर्ण झाले. संतांच्या सानिध्यात आल्यावर प्रत्येकाच्या वाट्याला सुखी जीवन लाभले. याउलट दानव वृत्ती असलेल्यांचे सानिध्य आपणास वाईट वळणावर नेऊन ठेवते. रामाच्या सानिध्यात राहिल्यावर किंवा त्याच्या तत्त्वाचे पालन केल्यावर बिभीषण आपले जीवन सुवर्ण बनवू शकला, तर दुसऱ्या बाजूला कुंभकर्ण रावणाच्या कूट वृत्तीच्या सानिध्यात राहून त्याला आपला बळी द्यावा लागला. मंथरासारख्या कपटी दासीच्या संगतीमध्ये येऊन कैकयीने स्वतःच्या जीवनाचे नुकसान करून घेतले हे आपणास ज्ञात असून, महाभारत व रामायण यामधून चांगल्या संगतीमध्ये आल्यावर जीवनाचे सुवर्ण व वाईट व्यक्तीच्या संगतीमध्ये आल्यावर याच जीवनाचा कोळसा झाल्याचे अनेक उदाहरणं देता येतील. आयुष्य नावाच्या रांगोळीत, संत विचाररूपी रंग किंवा चांगल्या विचाराचे रंग भरले, तर ही रांगोळी अधिकच आकर्षक होईल.



फुलांच्या सानिध्यात राहून मातीला सुगंध येतो, तसाच सद्गुणी माणसाच्या सानिध्यात राहिल्यावर, आपल्या जीवनाची दिशा सकारात्मक होऊन आपले जीवन सुखी, आनंदी, चांगले होण्याची शक्यता वाढत जाते. आजच्या काळाचा विचार केला तर लक्षात येते की, आपल्या तरुण पिढीवर चांगल्या संस्कार करणाऱ्या माणसांची गरज असून, वाढते आधुनिक जीवन व त्यांना कुणाच्या संगतीत रहावे हे उमगत नसल्याचे लक्षात येते. बेभान वारा वाहत असल्यासारखा आजचा तरुण योग्य संगतिविना वाईट मार्गावर वाहत जाऊन त्याचा शेवट फार भयाण होतो हे आज आधुनिक जगात सर्वत्र दिसते आहे. शबरीचे बोर खाणाऱ्या रामाच्या सानिध्यात आल्यावर तिचा सुद्धा उद्धार होतो हे सर्व ज्ञात आहे.

विद्यार्थ्याला ग्रंथरूपी परिसाच्या सानिध्यात येऊन, जीवनाचे सुवर्ण करता येते. महात्मा फुले यांना थॉमस पेनचे पुस्तक परिसासारखे वाटले, तर आंबेडकरांना गौतम बुद्धांचे चरित्र. उत्कृष्ट ग्रंथ, मित्र, पुस्तके, शेजारी, गुरु, शिक्षक व आदर्श जीवनाच्या गाथा, आपल्यासाठी परीसच असून, आपण या परिसाचा लाभ घेऊन आपले जीवन सुवर्ण बनवू शकतो.

याबरोबरच आपण कितीही वाईट व्यक्तीच्या संगतीला लागलो तरी आपण त्याच्या प्रभावाखाली न येण्याचे कसब दाखवू शकतो, त्यास मनाच्या भक्कम सकारात्मक रुपाची गरज असते. जीभ सर्व अन्नग्रहण करते, पण पोटाचा आकार वाढतो, जीभेचा आकार वाढत नाही, त्याप्रमाणेच बऱ्याचदा वाईट व्यक्ती आपल्या जीवन मार्गात आपल्या सोबत राहतात, परंतु तरीदेखील आपण आपल्यावर प्रभाव न होऊ देता त्या जीभेप्रमाणे अलिप्त राहिले, तर नक्कीच आपल्यावर त्याचा प्रभाव होणार नाही. समाजाची आजची अवस्था पाहिली, तर सगळीकडे चांगल्या संगतीचा, खऱ्या मार्गदर्शकाचा अभाव असलेला दिसून येतो. आजच्या या आधुनिक जगात चांगली संगत मिळणे, ती ओळखणे ही तारेवरची कसरत असून, ही कसरत करताना आपली कसोटी लागते. पण ज्याने ही कसोटी यशस्वीपणे पार केली, त्याचे आयुष्य नक्कीच सुवर्ण होते. शेवटी हिंदीत म्हटल्याप्रमाणे,

संग जया जैसा,
लाभ तया तैसा!

म्हणून आयुष्यात चांगल्याच्या संगतीने लाभ व वाईट वृत्तीच्या माणसाच्या संगतीने नुकसान झाल्याचे अनेक मूर्तिमंत उदाहरण दिसून येतात. श्रीकृष्णासारखा सारथी किंवा सखा, मित्र, जर आपल्याला आयुष्याच्या रथावर सारथी म्हणून भेटला, तर या आयुष्यरुपी कुरुक्षेत्रावर आपला विजय नक्कीच होईल. जीवनात चांगल्याचा, सत्याचा, संत विचारांचा, संग घडला तर नक्कीच आयुष्याचा सत्संग होईल...

संग अच्छे का,
साथ सच्चे का,
रंग लायेगा,
जिंदगी मे खुशियो का.

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोहिपिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

# गोरगरिबांचे जीव कवडीमोल

मागील ९ वर्षात म्हणजे २०१७ ते २०२६ दरम्यान गटार व सेप्टिक टँक साफ करताना ६२२ सफाई कामगारांचा मृत्यू झाला आहे अशी धक्कादायक माहिती केंद्र सरकारने लोकसभेत दिली आहे. यातील अनेक मृत्यू सुरक्षा उपकरणांशिवाय काम केल्याने गुदमरुन झाले आहेत. विशेष म्हणजे यातील ५२ कामगारांच्या कुटुंबियांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नाही. मागील ९ वर्षात ६२२ सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती खुद्द केंद्र सरकारने लोकसभेत देऊनही त्याची दखल माध्यमांनी घेतली नाही. नाही म्हणायला प्रिंट मीडिया म्हणजे काही वर्तमान पत्रात ही बातमी छापून आली, पण इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे न्युज चॅनलने या बातमीची दखलच घेतली नाही. एरव्ही कोणत्याही अदखलपात्र बातम्या ब्रेकिंग न्युज म्हणून दाखवणाऱ्या न्युज चॅनलवाल्यांना या बातमीची दखलही घ्यावीशी वाटली नाही हे विशेष.

अर्थात सफाई कामगारांचा गटार किंवा सेप्टिक टँकची सफाई करताना मृत्यू झाल्याची बातमी माध्यमांच्या दृष्टीने गौणच असते. गटार साफ करताना गुदमरुन किंवा पाण्याच्या टाकीत पडून गोरगरीब मजुरांचा मृत्यू झाल्याच्या अनेक घटना आपल्या आजुबाजूला घडत असतात पण त्याची दखल घ्यावी असे कोणाला वाटत नाही नाही. अशा बातम्यांची दखल ना राजकारणी घेतात, ना माध्यमे ना लोक त्यामुळे ९ वर्षात ६२२ सफाई कामगारांचा मृत्यू झाल्याची दखल कोणी घेतली नाही याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.



आपल्या देशात गोरगरीब मजुरांचा जीव कवडीमोल आहे. हे गोरगरीब जगले काय नी मेले काय याचे कोणालाही काहीही सोयरसुतक नाही. अशा दुर्दैवी घटनेत अनेक मजुरांनी आपला जीव गमवला आहे. अनेक मजूर योग्य त्या सुरक्षेअभावी उंच बांधकामावरून पडून जीवाला मुकतात किंवा कायमचे अपंग होतात. काही मजूर पाण्याच्या, शौचालयाच्या टाकीत पडून मरतात. काही मजूर नाले सफाई करताना श्वास गुदमरून मरतात तर काही मजूर विजेच्या खांबावर चढून विजेचे काम करताना शॉक लागून मरतात. अशा प्रकारे अनैसर्गिक मृत्यू पावणाऱ्यांची संख्या शेकडोंच्या घरात असते पण त्याची दखल शासन, माध्यमे, समाज, पोलीस न्यायालय कोणीच घेत नाही कारण ते गरीब आहेत. सर्वसामान्य नागरिक आहेत तेच जर सुशांतसिंग राजपूत, पूजा चव्हाण यांच्यासारखे सेलिब्रिटी असते तर सर्व यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या असत्या. माध्यमांनी २४ तास ब्रेकिंग न्युज चालवून टाहो फोडला असता. विरोधी पक्ष किंवा राजकीय नेतेमंडळींनी निदर्शने रास्ता रोको , धरणे आंदोलने केली असती.

पण सर्व सामान्य गोरगरिबांच्या मृत्यूचे येथे कोणालाच काही देणेघेणे नाही, गरीबच होता त्याच्या मृत्यूची दखल घ्यायला तो काय सेलिब्रिटी होता का ? असाच विचार येथील यंत्रणा करत असतील म्हणूनच गोरगरिबांच्या निधनानंतर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणी पुढे येत नाही. गरीब म्हणून जन्माला येणे हा या देशात शाप आहे. सेलिब्रिटींना न्याय मिळवून देण्यासाठी येथील यंत्रणा जितक्या जागृत असतात तितक्याच त्या गोरगरिबांना न्याय मिळवून देताना उदासीन असतात. गोरगरिबांच्या जीवाला येथे मोल नाही. कवडीमोल असलेले जगले काय नी मेले काय कोणालाच काही फरक पडत नाही हेच वास्तव आहे.

माणूस सामान्य असो गरीब असो की श्रीमंत असो प्रत्येकाचा जीव महत्वाचा असतो तथापि दुर्दैवी घटनांमध्ये गरिबांचे जीव हे बेदखल केले जातात, ही संतापाची बाब आहे. कोणत्याही निधनाच्या घटनेकडे सरकार बरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलपणे पाहण्याची गरज आहे. आज बदलत्या समाज व्यवस्थेमध्ये संवेदनशीलता हरवत चालली आहे हे देखील सत्य आहे. समाजाने अधिक संवेदनशील राहिले पाहिजे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
मो. ९९२२५४६२९५

# अनंत क्लबचे उद्घाटन व प्रेरणादायी व्याख्यान सोहळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथील स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेस अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या अनंत क्लबचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, तसेच त्यांच्या बौद्धिक, सर्जनशील व सामाजिक क्षमतांचा विकास घडविणे हा या क्लब स्थापनेमागील प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून दूर शिक्षण विभागाचे संचालक डॉ. प्रकाश निहलानी उपस्थित होते, तर प्र-कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि स्कूल ऑफ मॅथेमॅटिकल सायन्सेसच्या संचालिका डॉ. रूपाली जैन यांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. रूपाली जैन यांनी अनंत क्लबची संकल्पना व उद्दिष्टे प्रभावीपणे मांडली. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व सहशैक्षणिक उपक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी गणित व सांख्यिकी विषयांचे डेटा सायन्स व क्वांटम कॉम्प्युटिंग यांसारख्या आधुनिक क्षेत्रांतील वाढते महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत आधुनिक कौशल्ये आत्मसात करून स्टार्टअप्स व उद्योजकतेच्या माध्यमातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी अनंत क्लबच्या संघटनात्मक रचनेची घोषणा करण्यात आली. फॅकल्टी कोऑर्डिनेटर म्हणून डॉ. अनिकेत मुळे, स्टुडंट प्रेसिडेंट म्हणून अनिकेत अवचार, सेक्रेटरी म्हणून निकिता गाडेकर, जॉइंट सेक्रेटरी म्हणून तनिषा पिसारीवार, तर ट्रेझरर म्हणून सचिन साळवे यांची निवड करण्यात आली. तसेच इव्हेंट कोऑर्डिनेटर्स म्हणून पूजा खानसोळे, सुधाकर जाधव, ऐश्वर्या कोकाटे आणि श्वेता नरगोडे यांच्यावर जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. उद्घाटन सोहळ्यानंतर अनंत क्लबच्या पहिल्या उपक्रमांतर्गत Transformational Motivational Talk या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. प्रकाश निहलानी यांनी Igniting Young Minds या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सकारात्मक विचारसरणी, ध्येय निर्धारण, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. या कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी प्रकोष्ठाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांच्यासह डॉ. अनिकेत मुळे, डॉ. नितीन दारकुंडे, डॉ. उषा सांगळे व उदय दिव्यवीर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वेदिका सोनुने यांनी सुरेखरीत्या केले, तर आभार हिमांशू आकराते यांनी मानले.

उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला. भविष्यात अनंत क्लब विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रभावीपणे कार्यरत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# लहान येथे श्री बसवेश्वर बारशी यात्रा महोत्सवाला प्रारंभ



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील लहानच्या पंचक्रोशितील बहुचर्चित नंदी महादेवाचे प्रसिद्ध असे श्री बसवेश्वर देवस्थान आहे. या ठिकाणी प्रतीवर्षाप्रमाणे सोमवार, दि. ३० मार्चपासून दोन दिवस यात्रा महोत्सवाला प्रारंभ होणार आहे.

यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच यात्रेच्या दुसऱ्या दिवशी महादेव मंदिरावर कलशरोहण केले जाणार असून, नंतर कुस्त्यांची दंगल भरविण्यात येणार आहे.

लहान येथे नंदी महादेवाचे हेमाडपंथी प्राचीन मंदिर असून, हे मंदिर बसवेश्वर या नावाने जिल्ह्यात परिचित आहे. शासन दरबारी या देवस्थानास श्रीक्षेत्र 'क'चा दर्जा मिळाला आहे. तसेच गावाच्या प्रवेशद्वारावर देवस्थानाची भव्य अशी देखणी स्वागत कमान गावाच्या वैभवात भर घालण्याचे काम करते.

प्रतिवर्षी बारशी यात्रा महोत्सव साजरा केला जातो. सोमवारी महादेवाच्या शिळेचा रुद्राभिषेक करून नंदीच्या संजीवन मूर्तीस विभूषित अलंकाराने सजविण्यात येते. संपूर्ण मंदिर पुष्पहार गुच्छानी सुशोभित केला जातो. दुपारी चार ते सहा दरम्यान महादेवाची काठी यात्रेतील भक्त मंडळी मोठ्या भक्तिभावे नाचविण्याची प्रथा आहे. रात्री नऊ वाजता वेदांतचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज यांचे शिवकीर्तन होणार आहे.

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मंगळवार, दि. ३१ मार्च रोजी पहाटे ५ वाजता श्री बसवेश्वराची पालखी सोहळ्यांसह नूतन कळशाची गाव प्रदक्षिणा केली जाणार आहे. नंतर सकाळी दहा वाजता हभप अच्युत महाराज दस्तापूरकर यांच्या हस्ते महादेव मंदिरावर कलशरोहण केले जाणार व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. दुपारी ४ ते ६ दरम्यान कुस्त्यांची दंगल आणि विजयी पहेलवानास प्रथम बक्षीस – चंद्रकांत गवते पाटील यांच्याकडून ७७७७ रू., द्वितीय बक्षीस –कै. संजयराव पाटील इंगळे यांच्या स्मरणार्थ ५५५५ रू.तर तृतीय बक्षीस कै.हाजी अहेमदसाब शेख हैदरसाब यांच्या स्मरणार्थ ३,३३३ रू. तसेच इतरही बक्षिसे दिली जाणार आहेत. सदरील कुस्त्याच्या सामन्याचे उद्घाटन अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या हस्ते केले जाणार आहे. यानंतर यात्रेची सांगता केली जाणार आहे.

पान १ वरून...

**अशोक खरात प्रकरणात....**

एसआयटी कडून आता चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अशोक खरातने स्थापन केलेल्या 'शिवनिका' संस्थेच्या माध्यमातून अनेक आर्थिक व्यवहार आणि कार्यक्रम पार पडले होते. या संस्थेवर विविध वेळी कार्यरत असलेल्या सर्व आजी-माजी सदस्यांची आता एसआयटीकडून सखोल चौकशी केली जाणार आहे. या सदस्यांना लवकरच चौकशीसाठी पाचारण करण्यात येणार असून, संस्थेच्या निधीचा वापर आणि खरातला मिळालेले पाठबळ यावर पोलीस लक्ष केंद्रित करत आहेत.

## प्रा.डॉ. सुरेश मामीडवाार यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील



सरस्वती शिक्षण प्रसार मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील निवृत्त उपप्राचार्य प्रा डॉ. सुरेश संभाप्पा मामीडवाार (वय ८२- रा. वजिराबाद, नांदेड) यांचे २९ मार्च रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३० मार्च रोजी सकाळी ११ वाजता पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# रामनवमीनिमित्त बळीरामपूर येथे महाप्रसादाचे वाटप

**नवीन नांदेड़ (प्रतिनिधी)** – रामनवमीनिमित्ताने बळीरामपूर येथील जय हनुमान सोसायटी येथे रामनवमी उत्साहात साजरी करण्यात येऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी परिसरातील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन महाप्रसादाचा लाभ घेतला.

२६ मार्च रोजी बळीरामपूर येथील जय हनुमान सोसायटी येथे रामनवमीनिमित प्रारंभी रामाच्या प्रतिमेचे पूजन माजी जिल्हा परिषद सदस्य आनंदराव गुंडीले, गंगाप्रसाद काकडे़, सरपंच प्रतिनिधी मुन्ना ऊर्फ इंद्रजित पांचाळ, उपसरपंच पिंटू ऊर्फ नागेश



वाघमारे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रभाकर पोलसवार, मनीष पोलसवार आशीष पोलसवार यांनी केले होते. यावेळी महाप्रसादाचा लाभ गावातील महिला, पुरुष व गावकऱ्यांनी लाभ घेतला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी पवन सोनटक्के, यश पवन सोनटक्के, आकाश शिवाजी नंदलवार, जनार्दन सिरमेवार यांनी परिश्रम घेतले.





**मुखेड**–शहरातील नागरिकांना उन्हाळ्यात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समिती मोंढा येथे स्व. आ. गोविंदराव राठोड यांच्या स्मरणार्थ पाणपोईचे उद्घाटन आ. डॉ तुषार राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खुशालराव पाटील, लक्ष्मणराव पाटील, नागनाथ गायकवाड, राजकुमार बामणे, किशोरसिंह चौहान, व्यंकट लोहबंदे, राजकुमार घोडके, सुधीर चव्हाण, राजेश गजलवाड, राजू गंदपवाड, राम पाटील चांडोळकर, एम. डी. बदेवाड, शिवलिंग नाईक, बाळू नाईक, जुनेकर, शिवा आलेवार यांच्यासह सर्व भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**(छाया–गणेश आंबेकर मुखेड)**

# मध्यवर्ती बसस्थानकात स्मार्टकार्डबाबत प्रवाशांत जनजागृती

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विश्वासू प्रवासी संघटनेच्या वतीने नांदेड जिल्हा मध्यवर्ती बस- स्थानकामध्ये प्रवाशांना स्मार्ट कार्ड विषयी जनजागृती करण्यात आली.

यावेळी ७५ वर्षानंतरच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासासाठी तसेच बारा ते ६४ वर्षापर्यंत मुली व महिलांना हाफ तिकीटसाठी स्मार्ट कार्डबद्दल तसेच शाळा व महाविद्यालय विद्यार्थ्यांनासुद्धा स्मार्ट कार्डाविषयी माहिती देण्यात आली. स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त यांना सवलत तथा मोफत प्रवासादरम्यान स्मार्ट कार्डबद्दल संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर यांनी मार्गदर्शन केले.

एसटी बसच्या सवलतीसाठी रुपे ऑन द गो एनसीएमसी स्मार्ट कार्ड आवश्यक आहे, लवकरच यापुढे एनसीएमसी कार्ड नसल्यास पूर्ण भाडे आकारले जाईल याची डिलिव्हरी ३० दिवसांत नोंदणीच्या ठिकाणी मिळेल. सवलत तिकीट फक्त कार्ड वॉलेटमधूनच दिले जाईल, वॉलेट कॅश किंवा यूपीआयने टॉप अप करता येईल. एनसीएमसी कार्डवर आधार कार्डनुसार नाव व फोटो असतील, सदर कार्ड रोख समतुल्य व अ हस्तांतरणीय आहे. सवलतीधारी प्रवाशांनी आरक्षण तिकीट काढताना कार्ड व्हॅलिडेशन करणे आवश्यक आहे. हरवलेले किंवा खराब झालेले कार्ड सशुल्क पद्धतीने



बदलून देण्यात येतील, सर्व सवलतधारकांना व मोफत प्रवासधारकांना कागदपत्र आवश्यक आहे. महिला, आधार कार्ड, ज्येष्ठ नागरिक, आधार कार्ड, अमृत ज्येष्ठ नागरिक, आधार कार्ड, दृष्टीहीन, वैश्विक ओळखपत्र, दिव्यांग शारीरिक अपंग वैश्विक ओळखपत्र, विद्यार्थी सरळ क्रमांक, इतर सर्व सवलती, शासकीय प्रमाणपत्र, सवलत नसलेले प्रवासी, मोबाईल ओटीपी इत्यादीबद्दल माहिती देण्यात आली.

या प्रसंगी बस स्थानक प्रमुख यासिन खान, विश्वासू प्रवासी संघटनेचे उपाध्यक्ष कृष्णा उमरीकर, मनोज पाटील, संभाजी धुतराज, राजेश वाघमारे, अधिकारी, कर्मचारी, प्रवासी उपस्थित होते.

# श्रीराम नवमीनिमित्त शिवमहापुराण कथा, श्रीराम जन्मोत्सवाची महाप्रसादाने सांगता





**नरसीफाटा (वार्ताहर)** – येथील श्रीराम मंदिर परिसरात राम नवमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या संगीतमय शिवमहापुराण कथा व लक्ष्मण शक्ती श्रीराम जन्मोत्सव भक्तीमय सोहळ्याची सांगता पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थितीत महाप्रसाने करण्यात आली.

ह.भ.प. पिराजी महाराज राजलवाड व ह.भ.प. रामकिशन महाराज राजेलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुढी पाडव्यापासून रामनवमीपर्यंत शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले. हनुमान गड संस्थान तेलूचे येथील प्रख्यात शिवकथा प्रवक्ते स्वामी ब्रम्हानंद सरस्वती महाराज यांनी उपस्थित भाविकांना आध्यात्मिक मार्गाचा उपदेश केला.तर रात्री लक्ष्मण शक्ती प्रभू श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यासह भाविकांनी कथेचा लाभ घेत मंदिर परिसरात गर्दी केली होती. दि. २७ मार्च रोजी रामकिशन महाराज राजेलवाड यांचे काल्याचे कीर्तन झाले. कीर्तनात त्यांनी रामजन्म सोहळा आणि भक्तीचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी हभप भगवान महाराज मुगावकर, गंगाधर वडगावे, भीमराव पांचाळ, रंगनाथ राजेलवाड, बाबूराव राजेलवाड, हाणमंतराव कोकणे, तुकाराम वडजे, बाबूराव कोरे, पांडुरंग पांचाळ, नागोराव काचेबोईनवाड यांच्यासह गावातील महिलांनी परिश्रम घेतले.

## प्रणव सूर्यवंशीचे जवाहर नवोदय परीक्षेत यश

**नांदेड (प्रतिनिधी)** – बामणी येथील एकलव्य



इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी प्रणव मारोती सूर्यवंशी या विद्यार्थ्याने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

या देदीप्यमान कामगिरीबद्दल शाळेचे संस्थापक तथा प्रसिद्ध उद्योजक मारोती कंठेवाड, संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता कंठेवाड, संस्थेच्या सचिव डॉ. श्रद्धा कंठेवाड यांनी प्रणव सूर्यवंशी याचे विशेष कौतुक करून त्याची आई सौ. वैशाली मारोती सूर्यवंशी आणि वडील मारोती सूर्यवंशी यांचा विशेष सत्कार केला.

प्रणव सूर्यवंशी या विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल शाळेचे प्राचार्य रवींद्रन, उपप्राचार्य डॉ. सुनील काळे, शाळेचे सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले असून, एकलव्य शाळा ही गुणवत्तेचे केंद्र ठरत आहे, असे मत सौ. सविता कंठेवाड यांनी व्यक्त केले आहे. सर्व पालकवर्गातून प्रणव सूर्यवंशीचे अभिनंदन होत आहे.

# प्र–कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांची गांधीनगर येथील यूजीसी इंफ्लीबनेट केंद्रास भेट

**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांनी गांधीनगर (गुजरात) येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे अंतर विद्यापीठ असलेल्या इंफ्लीबनेट केंद्रास भेट दिली. इंफ्लीबनेट केंद्राचे प्र. संचालक मनोजकुमार के. यांनी इंफ्लीबनेट केंद्राचे सन्मानचिन्ह देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी इंफ्लीबनेट केंद्राच्या विविध विभागांना भेटी देऊन केंद्राचे उपक्रम व सेवांची माहिती करून घेतली. इंफ्लीबनेट हे भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्वाचे केंद्र असून भारतातील सर्व पीएच. डी. प्रबंधाचे डीजीटलायझेशन करून सर्व प्रबंध सर्वाना मुक्त उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वन



नेशन, वन सबस्क्रीप्शन अंतर्गत केंद्र शासनाच्या सहा हजार कोटी रुपयांच्या निधीतून तेरा हजारांहून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स व डाटाबेस भारतीय उच्च शिक्षण संस्थांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा इंफ्लीबनेटच्या उपक्रमात सक्रीय सहभाग असून, हे विद्यापीठ शोधगंगोत्री यामध्ये भारतात पहिला तर शोधगंगामध्ये महाराष्ट्रात तिसऱ्या व भारतात पहिल्या वीस विद्यापीठात आहे. वन नेशन, वन सबस्क्रीप्शन, वाङ्.मयचौर्य तपासणी, विद्वान प्रोफाईल, इंडकॅट, इंडियन रिसर्च इॅन्फोरमेशन मॅनेजमेंट सिस्टम, सोल, शेरनी, लिब वाहिनी इत्यादी डीजीटल उपक्रमातही हे विद्यापीठ सक्रीय आहे. विद्यापीठाच्या या सक्रीय सहभागाबद्दल इंफ्लीबनेट केंद्राचे प्र. संचालक मनोजकुमार के. यांनी आनंद व्यक्त करून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांचे अभिनंदन केले. तसेच प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांचा प्रतिनिधिक सत्कार केला.

यावेळी शास्त्रज्ञ हितेशकुमार सोळंकी, शास्त्रज्ञ पल्लभ प्रधान, शास्त्रज्ञ होशामनी यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी इंफ्लीबनेट केंद्राकडून प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अशोक महाजन यांच्या झालेल्या या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त केला.

# वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वसंतराव नाईक महाविद्यालय वसरणी नांदेड येथे बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा व एम.ए. इतिहास द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार हे होते तर प्रो. डॉ. रेणुका मोरे, प्रो. डॉ. नागेश कांबळे, डॉ.शेट्टे एस.व्ही., डॉ. आर. एम. कांगणे, डॉ. व्ही. एम. देशमुख, डॉ. अनिल गच्चे, डॉ. सुनीता गरुड, डॉ. गणेश लिंगमपल्ले, डॉ.साहेबराव शिंदे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुष्पपूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी बी. ए., बी. कॉम., बी.एस.सी. प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी बी.ए., बी.कॉम., बी.एस. सी. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व भेट देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी निरोप घेणाऱ्या कु.श्रेया कंधारे, सुहानी पवार, वैष्णवी दुधमल, प्रथमेश, शेख मोहसीन या विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात शिक्षण घेतानाच्या आठवणींना उजाळा देत आपले अनुभव कथन करून प्राध्यापकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो. डॉ. नागेश कांबळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी यापुढे देखील खूप मोठ्या प्रमाणात उच्च शिक्षण घेऊन आपलं स्वतःचं व महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे व पुढील येणाऱ्या प्रत्येक क्षेत्रात गरुडझेप घेण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन करून त्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रो. डॉ. रेणुका मोरे, डॉ. एस. व्ही. शेट्टे., डॉ. आर. एम. कांगणे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करून पुढील शैक्षणिक कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शशिकांत हटकर यांनी केले. तर आभार डॉ. ललिता अय्या यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. दिलीप पालीमकर, डॉ. साहेबराव मोरे, डॉ. यू. एस. कानवटे, डॉ. विजय मोरे, डॉ. संतोष शिंदे, प्रा. कविता हंबर्डे, प्रा. किशोर सूर्यवाड, से.नि.कार्यालयीन अधीक्षक आर.डी. राठोड, डॉ. श्रीराम अय्यर, डॉ.एल व्ही. खरात, प्रा.सुरेश तिवारी, प्रा. नितीन मुंडलोड, प्रा.कपिल हिंगोले, प्रा. प्रबुद्ध चित्ते, प्रा.डॉ. समाधान दराडे, डॉ. माधव पुयड, प्रा.मिर्झा जुनैद यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# नेसुबो महाविद्यालयात तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)** –नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदेड येथे बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.





शैक्षणिक वर्ष २०२५-२६ निमित्त आयोजित या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य आणि डोळ्यांत विरहाचे अश्रू उमटवले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. सुग्रीव फड होते. प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रा. डॉ. कल्पना कदम तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. मनीष देशपांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने मंगलमय वातावरणात झाली. प्रास्ताविकात डॉ. संदीप काळे यांनी विद्यार्थ्यांच्या मनात नवीन उमेदीची ज्योत प्रज्वलित करत निरोप हा शेवट नसून नव्या स्वप्नांच्या प्रवासाची सुरुवात आहे, असे प्रेरणादायी विचार मांडले.

यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील गोड आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली. राधिका कोकुलवार, गजानन राजरवाड, कृष्णा खरात, संभाजी तोटरे यांनी आपल्या भाषणातून मैत्री, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि अविस्मरणीय क्षण यांची भावनिक उजळणी केली. त्यांच्या शब्दांनी उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला आणि वातावरण भारावून गेले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. सुग्रीव फड यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत प्रामाणिकपणा, कष्ट आणि सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. स्पर्धेच्या या युगात टिकायचे असेल तर सर्वोच्च प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल, असे मार्गदर्शन त्यांनी केले.


प्रा. डॉ. कल्पना कदम यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जावे, असे आवाहन करत महाविद्यालयातील विविध आठवणींना उजाळा दिला. तसेच राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित विविध उपक्रमांतील पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. तसेच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात येणारा खासकरून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून तयार करण्यात आलेला 'अर्थज्ञान' या ग्रंथाचे विमोचन करण्यात आले. प्रा. डॉ. मनीष देशपांडे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या संधींचा योग्य उपयोग केल्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या कृतज्ञतेबद्दल समाधान व्यक्त करत येणारा काळ संधींनी परिपूर्ण आहे, त्याचा योग्य लाभ घ्या, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साधना मुंडे हिने प्रभावी शैलीत केले, तर आभार कु. शिवानी यादव हिने मानले.

# प्रगतीमंत्र

## कॉर्पोरेट नोकरी सोडून केवळ 12,000 रुपयांत सुरू केला व्यवसाय!

# कमावतोय लाखो रुपये...



**प्रदीप कुमार हे तामिळनाडूच्या वेल्लोरचे आहेत. २०१९ मध्ये चांगली नोकरी सोडून ते गावी परत आले. त्यांच्या आईवर गंभीर शस्त्रक्रिया झाल्यानंतर त्यांनी हा निर्णय घेतला. निरोगी जीवनशैली असूनही त्यांना स्वतःला किडनी स्टोनचा त्रास होऊ लागला. त्यांच्या लक्षात आले की खरी समस्या अन्नातील रसायने आहेत. केवळ १२,००० रुपयांच्या बचतीतून त्यांनी फूड फॉरेस्टची सुरुवात केली. आज ही नैसर्गिक शेती १०,००० हून अधिक ग्राहकांना शुद्ध अन्न पुरवते. या शेतीत शेकडो प्रकारची पिके घेतली जातात. चला, येथे प्रदीप कुमार यांच्या यशाच्या प्रवासाबद्दल जाणून घेऊया...**

### शेतीचा मार्ग कसा निवडला...

प्रदीप कुमार यांनी २०१४ मध्ये थंथाई पेरियार ई.व्ही. रामास्वामी पॉलिटेक्निक कॉलेजमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा पूर्ण केला. पदवीनंतर, त्यांना २०१४ मध्येच एल अँड टी (L&T) मध्ये कॅम्पस प्लेसमेंट मिळाली. एक अभियंता म्हणून त्यांनी राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरसह अनेक मोठ्या रस्ते आणि रेल्वे प्रकल्पांवर काम केले. नंतर ते टेरेक्समध्ये सर्व्हिस इंजिनिअर म्हणून रुजू झाले आणि सुमारे २०१९ पर्यंत कॉर्पोरेट क्षेत्रात काम करत राहिले. एकंदरीत, त्यांची कारकीर्द चांगली चालली होती, परंतु त्यांच्या कुटुंबातील आरोग्याच्या समस्यांनी त्यांना हादरवून सोडले. आपली तंदुरुस्ती आणि शिस्त असूनही स्वतःला आणि आपल्या आईला आजारी पडताना पाहून, त्यांनी प्रसिद्ध कृषी तज्ञ नम्मलवार यांच्या विचारांमधून प्रेरणा घेतली. त्यांच्या लक्षात आले की रासायनिक खतांनी पिकवलेली पिके मानवी अवयवांना आतून मारत आहेत. त्यानंतर त्यांनी दोन वर्षे संशोधन केले, उपवास आणि साधे अन्न खाण्याची जीवनशैली स्वीकारली. अखेरीस, त्यांनी आपली कॉर्पोरेट ओळख सोडून मातीशी नाते जोडण्याचा निर्णय घेतला.

### पडीक जमिनीत सोन्याची लागवड

जेव्हा प्रदीप कुमार वेल्लोरमधील आपल्या गावी परतले, तेव्हा अनेक वर्षांच्या रासायनिक शेतीमुळे जमीन जवळजवळ मृत झाली होती. सुरुवातीला, एक-दोन वर्षे काहीच उगवले नाही, जे खरोखरच निराशाजनक होते. पण प्रदीपने हार मानली नाही. त्यांनी पिकांऐवजी जमिनीला बरे करण्यावर लक्ष केंद्रित केले. त्यांनी देशी बियाणे वापरले आणि खत म्हणून जमिनीत वनस्पती परत रुजवल्या. हळूहळू, पक्षी आणि गांडूळ परत येऊ लागले. मग, एके दिवशी, त्या पडीक जमिनीचे एका समृद्ध अन्नवनात रूपांतर झाले, जिथे सेंद्रिय पिकांची लागवड केली जात होती.

### विक्रीसाठी व्हॉट्सअॅप मॉडेलचा अवलंब

प्रदीपने केवळ २ सेंट जमिनीपासून सुरुवात केली. आज, त्याचा विस्तार ४० सेंटपर्यंत झाला आहे. त्याच्याकडे टोमॅटो, वांगी आणि बाजरीसह देशी बियाण्यांच्या सुमारे ८०० जाती आहेत. त्याच्याकडे वेबसाइट किंवा मध्यस्थ नाही. त्याऐवजी, तो व्हॉट्स अॅपद्वारे थेट ग्राहकांना विक्री करतो. त्याच्या शेताची गुणवत्ता अशी आहे की, जिथे भेंडीच्या सामान्य रोपाला १०-३० फळे येतात, तिथे त्याच्या देशी बियाण्यांपासून वाढवलेल्या रोपांना १२० पर्यंत फळे येतात. तो दरवर्षी बीज महोत्सव देखील आयोजित करतो, ज्यात हजारो लोक सहभागी होतात.

### आता लाखोंची कमाई

१२,००० रुपयांच्या बचतीतून सुरू झालेला हा व्यवसाय आता एक यशस्वी मॉडेल बनला आहे. प्रदीप बियाण्यांमधून वार्षिक ३ लाख रुपये आणि भाजीपाल्यातून २ लाख रुपये कमावतो. विशेष गोष्ट अशी आहे की, पिकाची नासाडी टाळण्यासाठी तो उरलेल्या उत्पादनाचा वापर लोणची, प्युरी आणि सुक्या भाज्या बनवण्यासाठी करतो. दहा हजारांहून अधिक समाधानी ग्राहकांसह, प्रदीप हा त्या तरुणांसाठी एक आदर्श आहे, ज्यांना वाटते की शेतीसाठी खूप पैसा किंवा मोठा भूखंड लागतो. त्याचा मंत्र साधा आहे: आधी आपल्या जमिनीला समजून घ्या आणि यश आपोआप मिळेल.



# आयआयटी प्रवेश परीक्षेत होणार नाही कोणताही बदल, असा राहील जेईई पेपर पॅटर्न

**यावर्षी आयआयटी जेईईच्या परीक्षा पॅटर्नमध्ये कोणताही बदल होणार नाही. देशातील २३ प्रमुख आयआयटी आणि इतर अव्वल अभियांत्रिकी संस्थांमधील प्रवेशासाठी घेण्यात येणारी जेईई अॅडव्हान्स्ड २०२६ परीक्षा मागील वर्षाप्रमाणेच घेतली जाईल. काही काळापासून परीक्षेच्या पद्धतीत बदल करण्याबाबत चर्चा सुरू होती, परंतु आयआयटी रूरकीने स्पष्ट केले आहे की यावर्षी कोणतेही बदल केले जाणार नाहीत.**



> जेईई मेनच्या गुणांवर आधारित, अनेक चांगल्या संस्थांमध्ये प्रवेश मिळण्याची शक्यता असते. विद्यार्थ्यांना समुपदेशनासाठी आपली रणनीतीदेखील ठरवावी लागेल.
> **-प्रा. गुलशन कुमार धमिजा,** परीक्षा नियंत्रक, आयपी युनिव्हर्सिटी, दिल्ली



» पद्धत तीच राहणार : आयआयटी रूरकीने म्हटले आहे, की परीक्षेची पद्धत मागील परीक्षांप्रमाणेच राहील. तथापि, भविष्यातील वर्षांमध्ये परीक्षेच्या पद्धतीत बदल दिसू शकतात. मागील आयआयटी कौन्सिलच्या बैठकीत पद्धतीतील बदलावर चर्चा झाली आणि जेईई अॅडव्हान्स्ड ही अॅडॅप्टिव्ह पॅटर्नवर आधारित असावी असे सुचवण्यात आले आहे.

» १७ मे रोजी होणार जेईई अॅडव्हान्स्ड परीक्षा : आयआयटी कौन्सिल ही देशातील २३ प्रमुख अभियांत्रिकी संस्थांची सर्वोच्च संस्था आहे. जेईई अॅडव्हान्स्ड परीक्षा १७ मे रोजी होणार आहे. जेईई मेनच्या निकालाच्या आधारे २.५ लाख उमेदवार आयआयटीमध्ये प्रवेशासाठी जेईई अॅडव्हान्स्ड २०२६ परीक्षेला बसण्यास पात्र असतील. नोंदणी २३ एप्रिल ते २ मेपर्यंत होईल.

» जेईई मेन दुसऱ्या सत्राची परीक्षा कधी होणार? : नॅशनल टेस्टिंग एजन्सीने जेईई मेन दुसऱ्या सत्रासाठी एक्झाम सिटी स्लीप जारी केल्या आहेत. बीई आणि बीटेक पेपर १ परीक्षा २, ४, ५, ६ आणि ८ एप्रिल रोजी होणार आहेत. बीआर्च आणि बीप्लॅनिंगसाठी पेपर २ परीक्षा ७ एप्रिल रोजी होणार आहे. उमेदवारांना लवकरच प्रवेशपत्रे दिली जातील. आयपी युनिव्हर्सिटी, दिल्लीचे प्रा. गुलशन कुमार म्हणतात की, जेईई मेनच्या दुसऱ्या सत्राला बसणाऱ्यांनी उजळणीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

### सध्याचा जेईई पॅटर्न असा...

जेईई अॅडव्हान्स्ड २०२६ च्या अभ्यासक्रमात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या तीन विषयांवरील प्रश्नांचा समावेश आहे. यात इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या एनसीईआरटीमधील मुख्य संकल्पनांचा समावेश आहे. सध्याचा जेईई पेपर पॅटर्न पुढीलमाणे आहे. सध्याच्या परीक्षा पद्धतीत दोन पेपर असतात. एक पेपर सकाळी ९ ते दुपारी १२ पर्यंत आणि दुसरा पेपर दुपारी २:३० ते सायंकाळी ५:३० पर्यंत असतो. सध्या, प्रश्न भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित, म्हणजेच पीसीएम (PCM) या विषयांमधून विचारले जातात आणि यावर आधारित जेईई अॅडव्हान्स्डचा अभ्यासक्रम प्रसिद्ध करण्यात आला आहे.

### नवीन पद्धतीत काय असणार?

पद्धत बदलून त्यात अभियोग्यता आणि तर्कशास्त्राचे प्रश्न समाविष्ट करण्याचा विचार सुरू आहे, ज्यामुळे पीसीएम (PCM) प्रश्नांची संख्या कमी होऊ शकते. नवीन पद्धतीत काही विषयांना दैनंदिन समस्यांशी जोडून प्रश्न विचारले जाऊ शकतात. जेईई अॅडव्हान्स्ड (JEE Advanced) पद्धतीत सुधारणा करण्याची जबाबदारी संयुक्त प्रवेश मंडळाकडे (Joint Admission Board) सोपवण्यात आली आहे. पुढील एक-दोन वर्षांत नवीन पद्धती लागू केली जाईल, असा विश्वास आहे. आयआयटी परिषदेच्या (IIT Council) शेवटच्या बैठकीत, जेईई अॅडव्हान्स्ड परीक्षेसाठी कोचिंगवरील अवलंबित्व कमी करण्याच्या मुद्द्यावर चर्चा झाली. एक समितीही स्थापन करण्यात आली आहे.

# ऑफिसमधून निघण्यापूर्वी शेवटच्या 10 मिनिटांत करा या 6 गोष्टी...

**दिवसभर ईमेल, कॉल्स, मीटिंग्ज आणि टार्गेट्स पूर्ण केल्यानंतर, जेव्हा घरी जाण्याची वेळ येते, तेव्हा बहुतेक लोक घाईत असतात. तथापि, दररोज ऑफिसमधील तुमच्या कामाची शेवटची १० मिनिटे तुम्हाला पुढच्या दिवसासाठी तयार होण्यास मदत करू शकतात. दररोज ऑफिसमधून निघण्यापूर्वी शेवटच्या १० मिनिटांत काही जाणीवपूर्वक पावले उचलल्यास तुमचे काम अधिक ऑर्गनाइज्ड, एकाग्र आणि उत्पादक होऊ शकते. हे करण्यासाठी, या महत्त्वाच्या वेळेत तुम्हाला करायच्या असलेल्या सहा गोष्टी येथे दिल्या आहेत. त्या पूर्ण केल्याने, तुम्ही तुमचा ताण कमी करू शकता आणि स्वतःला उद्यासाठी तयार करू शकता...**



» पुढच्या दिवसाची तयारी आजच करा : ऑफिसमधून निघण्यापूर्वी तुमचे लक्ष कशावर केंद्रित आहे हे स्पष्ट असल्यास सकाळचा अर्धा ताण नाहीसा होतो. कामांची एक छोटी यादी, प्राधान्यक्रमांची योग्य मांडणी आणि महत्त्वाच्या बैठकांसाठीची स्मरणपत्रे तुम्हाला दुसऱ्या दिवशी गोंधळाशिवाय काम सुरू करण्यास मदत करतात. यामुळे तुम्हाला दुसऱ्या दिवशी आणखी चांगली कामगिरी करण्यास मदत होईल. ही सवय तुम्हाला एक जबाबदार प्रोफेशनल बनवते.

» स्वतःचे प्रामाणिक पुनरावलोकन महत्त्वाचे : ऑफिसमधील शेवटची १० मिनिटे ही स्वतःला प्रामाणिकपणे विचारण्याची योग्य वेळ आहे की तुम्ही आज काय साध्य केले, कुठे अडकलात आणि का. ही वेळ कोणाला तरी अहवाल देण्याची नाही, तर स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची एक संधी आहे. दिवसाचा संक्षिप्त आढावा घेतल्याने तुम्हाला उद्या काय पुन्हा करायचे आहे आणि कोणत्या चुका टाळायच्या आहेत हे ठरविण्यात मदत होते, ज्यामुळे प्रत्येक पुढचा दिवस थोडा अधिक प्रभावी बनतो.

» लक्ष केंद्रित ठेवा, घाईघाईत चुका करू नका : कामाची वेळ सुरू होताच, बरेच लोक मानसिकरित्या स्वतःला कामापासून वेगळे करतात, पण हाच तो क्षण असतो जेव्हा लक्ष केंद्रित ठेवणे सर्वात महत्त्वाचे असते. घाईगडबडीत, तुमच्याकडून एखादा महत्त्वाचा ईमेल सुटू शकतो, फाईल सेव्ह करायला विसरू शकता किंवा एखाद्या महत्त्वाच्या संदेशाला उत्तर न देता सोडून देऊ शकता. शेवटच्या काही मिनिटांपर्यंत लक्ष केंद्रित ठेवणे महत्त्वाचे आहे. हे तुमची व्यावसायिक वृत्ती दर्शवते आणि लहान-मोठ्या चुका टाळते.

» घरी जाण्यापूर्वी आपले मन शांत करा... : कामाची वेळ संपताच आपले मन कामाच्या दबावातून मुक्त करणे महत्त्वाचे आहे. जर दिवस थोडा तणावपूर्ण असेल, तर ती चिंता घरी घेऊन जाऊ नका. स्वतःला आठवण करून द्या की उद्या एक नवीन दिवस आहे आणि आजचा उर्वरित दिवस तुमच्या वैयक्तिक आयुष्यासाठी आहे. हे मानसिक संतुलन कामाचा अतिताण टाळते आणि व्यावसायिक व वैयक्तिक जीवनात निरोगी संतुलन राखते. त्यामुळे, ऑफिसमधील कोणताही ताण घरी न नेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

» धन्यवाद म्हणणे हेही व्यावसायिक कौशल्य : ऑफिसमधील यश केवळ तुमच्या कामावरच अवलंबून नसते, तर इतरांशी असलेल्या तुमच्या वागणुकीवरही अवलंबून असते. जर एखाद्या सहकाऱ्याने दिवसभर तुम्हाला मदत केली असेल किंवा तुमचे काम सोपे केले असेल, तर निघण्यापूर्वी धन्यवाद म्हटल्याने संबंध अधिक दृढ होतात. ही छोटी सवय कामाच्या ठिकाणी सकारात्मक वातावरण निर्माण करते आणि सांघिक कार्य सुधारते, ज्याचा तुम्हाला दीर्घकाळ फायदा होतो.

» ऑफिस सोडण्यापूर्वी डेस्क स्वच्छ करणे फायदेशीर : कामाच्या शेवटच्या काही मिनिटांत आपले डेस्क व्यवस्थित लावणे हे केवळ स्वच्छतेपुरते मर्यादित नाही, तर ती एक मानसिक तयारीसुद्धा आहे. विखुरलेली कागदपत्रे, न वापरलेल्या फाइल्स आणि कॉम्प्युटर स्क्रीनवर उघडे असलेले अनावश्यक टॅब्स तुमचे मन गोंधळात टाकू शकतात. जेव्हा तुम्ही दिवसाच्या शेवटी या गोष्टींची व्यवस्था लावता, तेव्हा तुम्ही दुसऱ्या दिवशी सकाळी एका स्वच्छ कामाच्या जागेने सुरुवात करता, ज्यामुळे एकाग्रता वाढते आणि कामाचा वेग वाढतो. ही सवय लावल्यास तुम्हाला तुमच्या करिअरमध्ये प्रगती करण्यास मदत होईल.

» यश नेहमीच मोठ्या निर्णयांतून किंवा अनपेक्षित संधींमधून मिळत नाही, तर दररोज अंगीकारलेल्या छोट्या सवयींमधून मिळते. हे लक्षात ठेवा की दररोज ऑफिसमधील शेवटची १० मिनिटे ही केवळ दिवसाचा शेवट नसून, पुढच्या दिवसाची सुरुवात असते. जर तुम्ही हा वेळ गांभीर्याने घ्यायला सुरुवात केली, तर प्रत्येक दिवस हळूहळू अधिक चांगला आणि यशस्वी होईल.

# 11 कोटींहून अधिक लोक भारतात वापरतात क्रेडिट कार्ड, 1 एप्रिलपासून बदलणार नियम...

नवीन आर्थिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू होत आहे. यासोबतच क्रेडिट कार्डशी संबंधित नियमांमध्ये बदल होणार आहेत. देशात ११ कोटींहून अधिक सक्रिय क्रेडिट कार्ड वापरकर्ते आहेत आणि दरमहा २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे व्यवहार होतात. आता नव्या वर्षात आयकर विभाग तुमच्या क्रेडिट कार्ड व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवू शकतो. १ एप्रिलपासून कोणते बदल होऊ शकतात ते जाणून घ्या...

१ एप्रिलपासून, तुमचे क्रेडिट कार्ड केवळ पेमेंट करण्याचे साधन राहणार नाही. ते तुमच्या टॅक्स प्रोफाइलशी जोडलेले एक मजबूत आर्थिक दस्तऐवज बनेल. जर तुमचे उत्पन्न, खर्च आणि टॅक्स फाइलिंगमध्ये कोणतीही तफावत नसेल, तर तुम्ही नवीन नियमांविषयी काळजी करू नये. तथापि, जर तुमचा खर्च जास्त असेल आणि तुमचे नोंदवलेले उत्पन्न कमी असेल, तर तुम्ही कर विभागाच्या छाननीखाली येऊ शकता.

» उच्च-मूल्याचे व्यवहार : क्रेडिट कार्ड वापरकर्त्यांसाठी सर्वात मोठा बदल म्हणजे उच्च-मूल्याच्या व्यवहारांची नोंद करणे. मसुदा नियमांनुसार, जर एखाद्या वापरकर्त्याने एका आर्थिक वर्षात क्रेडिट कार्ड वापरून १० लाख रुपये किंवा त्याहून अधिक रकमेचे पेमेंट केले असेल, तर तुमची बँक ही माहिती आयकर विभागाला कळवू शकते. निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त होणाऱ्या परदेशी खर्चावरही विभाग लक्ष ठेवेल. १ लाख रुपये किंवा त्याहून अधिक रकमेच्या रोख व्यवहारांवरही बारकाईने लक्ष ठेवले जाईल. स्पष्टपणे, जर तुमचा खर्च तुमच्या आयटीआरमध्ये (ITR) दर्शविलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त असेल, तर तुम्हाला नोटीस मिळू शकते.

» पॅन-क्रेडिट कार्ड लिंकिंग : मसुदा नियमांनुसार, आणखी एक मोठा बदल म्हणजे क्रेडिट कार्डसोबत पॅन लिंक करणे अनिवार्य करण्यात आले आहे. १ एप्रिलनंतर, बँका पॅनशिवाय क्रेडिट कार्ड जारी करणार नाहीत. याव्यतिरिक्त, तुम्हाला तुमची सध्याची क्रेडिट कार्ड्स तुमच्या पॅनशी लिंक करणे आवश्यक असेल. यामुळे तुमचे क्रेडिट कार्ड तुमच्या कर ओळखीचा एक अविभाज्य भाग बनेल. शिवाय, जर तुमचे क्रेडिट कार्ड स्टेटमेंट तीन महिन्यांपेक्षा जुने नसेल, तर पॅनसाठी अर्ज करताना ते पत्त्याचा पुरावा म्हणून सादर केले जाऊ शकते.

» कर भरण्यासाठी वैध : क्रेडिट कार्डमुळे तुमच्याकडे आणखी एक पर्याय उपलब्ध होऊ शकतो. आता, तुम्ही क्रेडिट कार्ड वापरून ऑनलाइन आयकर भरू शकता. आतापर्यंत हे फक्त डेबिट कार्ड आणि नेट बँकिंगद्वारे शक्य होते. आता, क्रेडिट कार्ड देखील इलेक्ट्रॉनिक पेमेंट मोड म्हणून स्वीकारले जातात. तथापि, बँका प्रोसेसिंग फी आकारू शकतात आणि जर तुम्ही तुमचे क्रेडिट कार्ड बिल वेळेवर भरण्यात अयशस्वी झालात, तर तुम्हाला व्याज भरावे लागू शकते.

# अजूनही वेळ गेलेली नाही, दोन्ही राष्ट्रवादीचं विलीनीकरण करून सुनेत्रा वहिनींचे नेतृत्व मान्य करा -आ. सुनील शेळके



**पुणे (प्रतिनिधी)** –राज्याच

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही पक्षाच्या विलीनीकरणासाठी बैठका झाल्या होत्या. परंतु विलीनीकरण होणार की नाही अशा चर्चा आहेत. या प्रश्नावर उत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि आमदार सुनील शेळके म्हणाले, अजूनही वेळ गेलेली नाही. दोन्ही राष्ट्रवादीचं विलिनीकरण झालं तर अभिमानाची बाब आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा वहिनींचं नेतृत्त्व मान्य करावं, असे विधानही आ. सुनील शेळके यांनी केले.

दादांच्या दुर्घटनेनंतर शरद पवार यांच्या पक्षातील काही मंडळी सांगत होते, आमच्या दादांसोबत चर्चा झाल्या, दोन्ही पक्ष एकत्रित पुढे जायचं आहे, परंतु अशा पद्धतीने आमच्याशी किंवा पक्षातील कोणत्याही नेत्यांशी दादांनी विस्तृतपणे चर्चा केलेली नव्हती, परंतु दोन्ही पक्ष एकत्रित असतील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वात मोठा होत असेल तर अजूनही वेळ गेलेली नाही, परंतु आमच्यासारख्या कार्यकर्त्यांची भूमिका किंवा भावना एकच होती. दादांच्या पश्चात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून आणि उत्तर अधिकारी म्हणून सुनेत्रा वहिनी आल्या पाहिजेत.

## राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वत: देव बनण्याचा प्रयत्न करू नका; अमोल मिटकरी

राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार सुनील तटकरे यांच्या मतदारसंघांमध्ये पार पडलेल्या कार्यक्रमाची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. पक्षाकडून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या उमेदवारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सत्कार समारंभाला सुनील तटकरे यांच्या सोबतच मंत्री आदिती तटकरे देखील उपस्थित होत्या. या कार्यक्रमात स्टेजवर लावलेल्या बॅनरवरची सध्या सर्वत्र चर्चा सुरु आहे. या कार्यक्रमसाठी लावलेला पोस्टरवर सुनील तटकरे, आदित्य तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांचे फोटो लावण्यात आले होते. मात्र दिवंगत अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि जय पवार यांचे फोटो नसल्याचे दिसते आहे. त्यावरुन राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ज्यांच्या नेतृत्वावर कार्यकर्त्यांचा विश्वास आहे, त्यांचाच फोटो हटवला जातोय असा संताप व्यक्त करीत राष्ट्रवादीच्या दैवतांना डावलून स्वतः देव बनण्याचा प्रयत्न करू नका, असा नाव न घेता सुनील तटकरे यांना मिटकरी यांनी टोला लगावता.

# आखाती देशातील युद्धाचा निर्यातीला फटका, शेती क्षेत्रावर मोठा परिणाम

**मुंबई(प्रतिनिधी)** –इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यातील संघर्ष वाढतच चालला आहे. युद्धाच्या दुसऱ्या महिन्यात प्रवेश करताच, इस्रायलने इराणवर जोरदार हल्ले केले आहेत. अशातच या युद्धाचा भारतासह जगभरातील अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. आखाती देशातील युद्धाचा परिणाम शेतीमालाच्या आयात निर्यातीवर १००% टक्के होणार आहे. देशातील माल निर्यात होत नसल्याने त्याचा फटका बाजारभावावर दिसत आहे. तसेच युरियाचा साठ्याबाबत भविष्यात काळजी घ्यावी लागेल, अशी चिंता राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केली आहे.

राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून पंचनामे करण्याचे आदेश दिले आहे. शेती नुकसानीचा अहवाल आल्यानंतर तातडीने शेतकऱ्यांना मदत केली जाणार आहे. ऑगस्ट महिन्यापर्यंत पावसाचं प्रमाण कमी राहणार असल्याने शेतकऱ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा. उन्हाळा कडक असून १७ एप्रिलनंतर तापमान वाढणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकरी यावर्षी हवामानातील बदलामुळे झालेल्या नुकसानीमुळे संकटात सापडले आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे एकीकडे काजू उत्पादनात ६० ते ६५ टक्के घट झाली आहे. तर दुसरीकडे काही प्रमाणात आलेलं उत्पन्न जगली प्राणी तोडून किंवा खाऊन वाया घालवत आल्याने दुहेरी संकटात कोकणातील काजू उत्पादक शेतकरी सापडला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काजू उत्पादक शेतकरी आता जंगली प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीने त्रस्त आहे.

राज्य प्राणी शेकरू हिरवी काजू बी खाऊन नुकसान करत असल्याने शेतकऱ्यांच्या हाती काजू बी येत नसल्याने मोठ नुकसान होत आहे. शेकरू हा प्राणी संरक्षित प्राणी असून सिंधुदुर्गात ठिकठिकाणी शेकरूची सख्या वाढली आहे. मात्र आता हा शेकरू प्राणी शेतकऱ्यांच्या काजू बी खाऊन मोठ्या प्रमाणात नुकसान करत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. तसेच शेकरू प्राण्याने नुकसान केल्याने नुकसान भरपाई मिळत नाही, कारण नुकसानग्रस्त यादीत शेकरू प्राण्याचा समावेश नाही. त्यामुळे समावेश करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# रायगड राष्ट्रवादीच्या बॅनरवरून अजित पवार, सुनेत्रा पवार गायब; फोटो फक्त तटकरे कुटुंबियांचे




**रायगड(प्रतिनिधी)**–राष्ट्रवादी काँग्रेसच्या बॅनरवरून दिवंगत नेते अजित पवार, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवारांचाच फोटो गायब झाल्याचं रायगडमध्ये दिसून आलं. राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघातील एका कार्यक्रमाच्या बॅनरवर या दोन्ही नेत्यांचे फोटो गायब झाले. त्याचवेळी त्या बॅनरवर सुनील तटकरे, आदिती तटकरे आणि अनिकेत तटकरे यांचे फोटो मात्र दिसून आले. या कार्यक्रमाला स्वतः खासदार सुनील तटकरे उपस्थित असल्याने आता त्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्यावर राष्ट्रवादी पक्ष फोडल्याचा आरोप आरोप होत असताना रायगडमध्ये पक्षाच्या कार्यक्रमांच्या बॅनरवरून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, स्वर्गीय अजित पवार यांच्यासह पक्षश्रेष्टींचे फोटो बेपत्ता झाल्याचे समोर आलं आहे.

मंत्री आदिती तटकरेंच्या मतदारसंघातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्यासपीठावरील बॅनरवर खासदार सुनिल तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह स्थानिक नेत्यांचे फोटो लावण्यात आले होते. मात्र या बॅनरवर स्वर्गीय अजित पवार, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह पक्षश्रेष्टींचे फोटो लावण्यात आले नाहीत. रायगडमध्ये राष्ट्रवादीच्या बॅनरवरून पक्षश्रेष्टी बेपत्ता होत असल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरु झाल्या आहेत.

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी ताब्यात घेण्याचे सुनील तटकरेंचे प्रयत्न असल्याचा आरोप अनेकदा आमदार रोहित पवार आणि शरद पवारांच्या गटातील नेत्यांनी केला आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादीच्या बॅनरवरून अजित पवारांचाच फोटो गायब झाल्याचे जोरदार चर्चा सुरू आहे.

या प्रकरणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी सुनील तटकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. दादांचा पक्ष ताब्यात घेण्याचे तटकरेंचे मनसुबे लपून राहिले नाहीत. त्याची सुरुवात आता रायगडमधून झाली असल्याची टीका लवांडे यांनी केली. तुमच्यात हिंमत असेल तर तुम्ही प्रफुल पटेल यांच्यासोबत वेगळा पक्ष काढावा, किंवा भाजपमध्ये जावं असा टोलाही लवांडे यांनी लगावला.

# राज्यातील शाळांसाठी उन्हाळी सुट्टी जाहीर, २ मे पासून ते १४ जूनपर्यंत शाळा राहणार बंद

**मुंबई(प्रतिनिधी)** – राज्यातील प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठीची उन्हाळी सुट्टी जाहीर झाली आहे. राज्यातील राज्य मंडळाच्या शाळांना २ मे पासून सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. १४ जूनपर्यंत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तर पुढील शैक्षणिक वर्ष २०२६- २७ मध्य विदर्भ व इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १५ जून रोजी सुरु होणार आहे.

**१५ जून ते २९ जून पर्यंत सकाळच्या सत्रात शाळा भरवण्यात येणार**

जून महिन्यात विदर्भाचे तापमान विचारात घेता उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर राज्य मंडळाच्या शाळा १५ जून ते २९ जूनपर्यंत सकाळच्या सत्रात सकाळी सात ते ११:४५ यावेळेस सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, तर ३० जून पासून विदर्भातील शाळा सुद्धा नियमित सुरु होतील. राज्यातील इतर मंडळांच्या शाळांचे वेळापत्रक पाहता व त्या शाळां- मधील विविध उपक्रम राबवण्यात येत असल्याने सुट्टी जाहीर करण्याबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा असं परिपत्रकात शिक्षण विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळातून उन्हाळ्याची व दिवाळीची सुट्टी याबाबत सुसूत्रता राहावी म्हणून शिक्षण संचालनालयामार्फत दरवर्षी शैक्षणिक वर्षातील सुट्ट्यांची निश्चिती करण्यात येते. त्यानुसार सुट्यांबाबत या सूचना जिल्यातील सर्व मान्यताप्राप्त शासकीय, अशासकीय प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांना देण्यात आल्या आहेत. माध्यमिक शाळा संहिता नियम ५२(२) नुसार शैक्षणिक वर्षातील सर्व प्रकारच्या एकूण सुट्ट्या ७६ दिवसांपेक्षा जास्त होणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. शैक्षणिक वर्षातील किमान २२० दिवस अध्यपन होणे गरजेचे आहे. त्यानुसार सुट्ट्यांचे नियोजन करण्यात येते.



# मुंबई इंडियन्सचा केकेआरवर धमाकेदार विजय

**मुंबई (प्रतिनिधी)**– आयपीएल २०२६ चा दुसरा सामना मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यामध्ये पार पडला. वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यामध्ये मुंबई इंडियन्स संघाने केकेआरवर सहा विकेटने विजय मिळवत इतिहास रचला आहे. केकेआरने मुंबईला दिलेले २२१ धावांचे लक्ष्य १९.१ ओव्हरमध्ये सहज पूर्ण करत १३ वर्ष पहिला सामना गमावण्याचा डाग पुसून काढला. त्यासोबतच मुंबईने इतिहासामधील सर्वाधिक धावांचे आव्हान यशस्वीपणे पूर्ण केले आहे.

या सामन्यात रायन रिकेल्टनने सर्वाधिक ८१ धावा आणि रोहित शर्माने ७८ धावा करत विजयाचा पाया रचला. दोघांच्या वादळी खेळीसमोर केकेआरच्या गोलंदाजांनी गुडघे टेकले होते. २२१ धावांचा पाठलाग करताना दोघांनी १४८ धावांची सलामी देत खऱ्या अर्थाने केकेआरला बॅकफुटला ढकलत सामना पूर्णपणे झुकवला होता. त्यानंतर कॅप्टन हार्दिक पांड्या आणि नमन धीर यांनी विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयासह मुंबईने पहिल्याच सामन्यात विजयाचा श्रीगणेशा केला आहे.

मुंबई इंडियन्सकडून रोहित शर्मा आणि रायन रिकेल्टन सलामीला आले होते. दोघांनी १४८ धावांची सलामी दिली त्यामुळे २२१ धावांचे लक्ष्य पूर्ण करताना मुंबईला फार दबाव आला नाही. पॉवर प्ले मध्ये दोघांनी केकेआरच्या गोलंदाजांना बदडून काढले. सूर्यकुमार यादव १६ धावा, तिलक वर्मा २० धावा, हार्दिक पांड्या नाबाद १८ धावा आणि नमन धीर नाबाद ५ धावांवर नाबाद राहिले. केकेआरकडून कार्तिक त्यागी, वैभव अरोरा आणि सुनील नरेन यांनी प्रत्येकी एक विकेट नावावर केली.

## इस्रायलमधील केमिकल फॅक्टरीवर इराणचा हल्ला

**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**– इराणने बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने इस्रायलच्या एका प्रमुख रासायनिक कारखान्यावर अर्थात केमिकल फॅक्टरीवर हल्ला केला आहे. इस्रायलमधील नेओत होवाव येथे मोठ्या केमिकल फॅक्टरीवर इराणने बॅलिस्टिक क्षेपणास्त्राद्वारे हल्ला केला.



**कार्यालय, उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. नांदेड.**

सहकार भवन, भू-विकास बँक इमारत पहिला मजला, आय.टी.आय. समोर, नांदेड.

{ Email ID - dyrcsnanded@gmail.com}

रासनिप्रा

जा.क्रं. उपनिनां कक्ष-1/प्रा.मत.यादी कार्यक्रम (क)वर्ग संस्था/ /2026 दिनांक :- 27/03/2026.

**व्यवस्थापक समिती पंचवार्षीक निवडणूक कार्यक्रम सन 2026 ते 2031 (क वर्ग संस्था)**

**मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960, नियम, 1961 व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम,2014 (सुधारणासह) चे नियम 2 (तीन) (1 ते 12) आणि नियम 75(2) (क) तसेच मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. 1771 दि. 20/05/2020 मधील तरतुदी/सुचने नुसार दिनांक 01/02/2026 या अर्हता दिनांकावर तयार केलेल्या खालील एकुण (07) सहकारी संस्थेच्या प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करीत आहे.

| अ.क्रं. | संस्थेचे नांव |
|---|---|
| 1 | सिटी अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड ता. जि. नांदेड. |
| 2 | गोदावरी सहकारी पतपेढी मर्यादीत गुजराती हायस्कुल, नांदेड. |
| 3 | अपंग कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. नांदेड जि. नांदेड. |
| 4 | दि. डायमंड को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लि. नांदेड ता. जि. नांदेड. |
| 5 | सेवा सहकारी संस्था लि. थुगाव ता. जि. नांदेड. |
| 6 | तिरुपती नागरी सहकारी पतसंस्था म. सन्मित्रनगर, नांदेड. |
| 7 | तत्पर नागरी सहकारी पतसंस्था म. सहयोग नगर, नांदेड. |

| अ.क्रं. | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ / ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | 30/03/2026 | स. 11.00 वाजता | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड व सबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर. |
| 2 | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप मागविणे. | 27/03/2026 ते 06/04/2026 | कार्यालयीन वेळेमध्ये | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड. |
| 3 | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप वर निर्णय घेणे. | 10/04/2026 | कार्यालयीन वेळेमध्ये | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड. |
| 4 | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | 10/04/2026 | दू. 17.00 वाजता | उप निबंधक सहकारी संस्था, ता. नांदेड व सबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर. |

(अनिल चव्हाण)

तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा

**उपनिबंधक सहकारी संस्था,ता.नांदेड.**



# १५० दिवसांच्या सेवाकर्मी प्लस कार्यक्रमात महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ प्रथम

**मुंबई(प्रतिनिधी)** –राज्य शासनाच्या १५० दिवसांचा सेवाकर्मी प्लस कार्यक्रम अंतर्गत विविध शासकीय संस्था, महामंडळे, प्राधिकरणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले. या विशेष मोहिमेत राज्यातील इतर महामंडळांप्रमाणे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळानेही राज्यातील महामंडळांच्या वर्गवारीत प्रथम क्रमांक पटकावला आहे.



**तहसील कार्यालय देगलूर**

जा.क्र.२०२५/जमा-२/है.इ.नि./देगलूर/कावी-

ई-मेल tahdegloorgmail.com

दूरध्वनी क्रं.०२४६३२५५०३३ दि. २५/०२/२०२६

**जाहीर प्रगटन**

विषयः- जिल्ह्यातील सर्व हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणेबाबतच्या प्रकरणातील माहिती सादर करणेबाबत

संदर्भः- मा.अप्पर जिल्हाधिकारी नांदेड यांचे अ.शा.पत्र क्र. २०२५/साशा/१/भुसूधार/कावी-

दि.११/१२/२०२५

देगलूर तालुक्यातील सर्व जनतेस कळविण्यात येते कि, हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४चे कलम ६(३)नुसार झालेल्या जमिनीचे कृषक / अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणेबाबतच्या प्रकरणात मौ. देगलूर येथील सर्वे नं.७२ गट क्र.२६४ मधील क्षे.०.६६ आर. या जमिनीचे अर्जदार श्री. बालाजी रामलू पांचाळ रा. भोकसखेडा ता. देगलूर यांनी मा.जिल्हाधिकारी नांदेड यांचे कार्यालयास अर्ज देऊन विनंती केली आहे.

उक्त प्रकरणात सदर जमिनीबाबत खालील मुद्याप्रमाणे कोणाचे आक्षेप आहेत काय?

१. खरेदीखत अधिकार अभिलेखाबाबत न्यायालयीन वाद किंवा न्यायालयात प्रकरणे चालू आहे किंवा कसे? २. जमीन वक्फ मालमत्ता आहे किंवा कसे?

३. सदर जमीन संपादन झाली आहे किंवा कसे ?

४. सदर जमिन खिदमतमाश आहे काय? (होय / नाही)

तसेच सदरील जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणेबाबत कोणाचा आक्षेप असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्दी पासून ७ (सात) दिवसाचे आत तहसिल कार्यालय देगलूर येथे हजर राहून आपला आक्षेप नोंदविण्यात यावा.

उक्त कालावधीनंतरचे आक्षेप ग्राहय धरले जाणर नाहीत व सदरील मौ. देगलूर येथील सर्वे नं. ७२ गट क्र.२६४ मधील क्षे.०.६६ आर. या जमिनीचे हैद्राबाद इनाम निर्मुलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार झालेल्या जमिनीचे कृषक/अकृषक हस्तांतरण नियमीत करुन भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार देगलूर**

**जाहीर प्रगटन**

माझे पक्षकार श्री. माधवराव पि.दत्तराम इंगेवाड, रा. वाघाळा, ता. जि. नांदेड यांनी मला दिलेल्या माहिती, पुरविलेल्या कागदपत्रावरुन व अधिकारावरुन खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.-

सर्व जनतेस व हितसंसबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी १) श्री. संजय पि. दामोधर मुत्तेपवार, २) श्री. संतोष पि. दामोधर मुत्तेपवार, दोघे रा. सिडको, नांदेड ता. जि. नांदेड यांच्या जाती व मालकी ताब्यातील मौजे वाघाळा ता. जि.नांदेड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका हद्दीतील शेत गट नं. ६२/२ (६२) पैकी एक प्लॉट ज्याचा प्लॉट नं. ५१ आहे, ज्याची लांबी पुर्व-पश्चिम उत्तरेकडुन ५३ फुट ४ इंच फुट (१६.२६ मी.) आहेव दक्षिणेकडुन ५३ फुट (१६.१५ मी.) आहे व रुंदी दक्षिण-उत्तर पुर्वेकडुन ३५ फुट (१०.६७ मी.) व पश्चिमेकडुन ३६ फुट ८ इंच (११.१८ मी.) आहे. ज्याची चतु:सिमा पुर्वेस : ९.०० मी. रुंद सडक आहे, पश्चिमेस : प्लॉट नं. ७९ आहे,दक्षिणेस : प्लॉट नं. ५० आहे,उत्तरेस प्लॉट नं. ५२ आहे.

येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील प्लॉट आंतरीक व बाहय हक्कासह कायमस्वरुपी खरेदी करण्याचा करार केलेला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वर नमुद चतु:सिमेच्या आतील प्लॉटच्या खरेदी विक्री व्यवहारा बाबत कोणाचा कोणताही, काहीही आक्षेप, उजर, तक्रार, गहाण, हिस्सा, वाटणी, शासकीय बँक कर्ज, बोजा, तसेच खाजगी कर्जबोजा, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप मुळ कागदपत्रासह खालील पत्त्यावर हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०५ (पाच) दिवसाचे आत लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचाही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदर प्लॉटची रजिस्ट्री सह दुय्यम निबंधक कार्यालय, नांदेड येथे त्यांचे नांवे करुन घेतील. मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा कसल्याही प्रकारे विचार केल्या जाणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत
अ‍ॅड. एस. टी. भाले
सर्वे क्र. ५०, प्लॉट क्र. २२१,
गोदावरी हातमाग वस्त्रनिर्माण सोसायटी,
सिडको रोड, वसरणी, नांदेड
मो. ९४०४४५१८४६

जाहीर प्रगटन देणार
श्री माधवराव पि. दत्तराम इंगेवाड
रा. वाघाळा ता. जि.नांदेड
मो. ८००७७६१५५५

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## कुंटूर पोलिसांच्या कारवाईत अवैध वाळू उपसा करणारी एक कोटीची यंत्रसामुग्री जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** कुंटूर पोलीस आणि नायगाव तहसील यांच्या संयुक्त कारवाईमध्ये जवळपास एक कोटी रुपयाची अवैध वाळू वाहतूक करणारी यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली आहे. गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर ही कारवाई इज्जतगाव (ता. नायगाव) परिसरात करण्यात आली.

उस्माननगर व कुंटूर पोलीस स्टेशन तसेच महसूल विभागाच्या पथकाला इज्जतगाव येथील गोदावरी नदीपात्रात फायबर बोटींच्या सहाय्याने बेकायदेशीररीत्या काळ्या रेतीचे उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर संयुक्त छापा टाकला. कारवाईदरम्यान नायगावच्या तहसीलदार तृप्ती गायकवाड, कुंटूरचे सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले, उस्मानगरचे सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, मंडळ अधिकारी सचिन तारू, तलाठी गोविंद काळे, तलाठी बाबू डाकेवाड तसेच पोलीस अंमलदार माधव पल्लेवाड, गुलाब शिंदे, निळकंठ निम्मलवाड, अंगद आरे, अनिरुद्ध वाडे व इतर कर्मचारी सहभागी होते.

दि. २८ मार्च रोजी सकाळी पेट्रोलिंगदरम्यान सहायक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, इज्जतगाव येथील माधव बालाजी डोईफोडे यांच्या शेतालगत गोदावरी नदीपात्रात बोटींच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा सुरू आहे. त्यानुसार महसूल विभागाला कळवून संयुक्त पथकाने दुपारी घटनास्थळी धाड टाकली. पथक घटनास्थळी पोहोचताच वाळू उत्खनन करणारे आरोपी बोटी नदीकाठावर सोडून पळून गेले. पंचासमक्ष पाहणी केली असता ३ लोखंडी फायबर बोटी, ३ छोटे इंजिन लोखंडी बोटी, अंदाजे ४ ब्रास काळी रेती असा एकूण अंदाजित किंमत ९० लाख २० हजार रुपये किमतीचे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तहसीलदार नायगाव यांच्या आदेशानुसार पंचनामा करून बोटी जागेवर हलविणे अवघड असल्याने त्या जिलेटीनच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या, तर जप्त केलेली काळी रेती ताब्यात घेण्यात आली. तपासात बोटींचे मालक कैलास गंगाधर ढगे, रा. येळी कौडगाव, ता. लोहा, जि. नांदेड राजू कोंडीबा पाकलवाड, रा. वाघाळा, ता. जि. नांदेड यांच्या विरुद्ध पोलीस उपनिरीक्षक माधव पल्लेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कुंटूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैध पिस्तुल खरेदी विक्री करणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –**ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या नवीन मुझामपेठ धनेगाव पाटीजवळ सापळा रचून अवैध पिस्तुल खरेदी, विक्री करणाऱ्या तीन जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने २९ मार्च रोजी कारवाई केली असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस अधिकारी व अमलदार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार २९ मार्च रोजी धनेगाव पाटीजवळ नवीन मुझामपेठ येथे सापळा रचून आरोपी शेख अदील शेख शकील, महंमद फरानोद्दीन महंमद फखोरोद्दीन, आनंद ऊर्फ चिन्नु सरदार यादव यांची अंग झडती घेतली असता त्यात एक गावठी पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे, एक खंजर व एक मोटारसायकल असा एकूण १ लाख १० हजार रुपये मुद्देमाल मिळून आला.

या प्रकरणी उपनिरीक्षक व्यंकट कुसमे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कलम ३/२५,४/२५,७/२५, शस्त्र अधिनियम १९५९ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, वसंत केंद्रे, अजून मुंडे, विनोद पवार, मारोती पंचलिंग, शंकर माळगे, समीर अहेमद यांनी कारवाई केली.

या कारवाईचे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व वरिष्ठ अधिकारी यांनी अभिनंदन केले आहे. या प्रकरणी अधिक तपास उपनिरीक्षक भोसले हे करीत आहेत.

## लोहा शहरातील सिमेंट रस्त्याचे प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते भूमिपूजन



**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरातील सिमेंट रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते रविवार, दि. २९ मार्च रोजी भूमिपूजन करण्यात आले. नगराध्यक्ष शरद पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख यांची यावेळी उपस्थिती होती.

लोहा नगर परिषदेच्या निवडणुकीत विकास कामांचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आल्यानंतर येथील विकास कामाला गती मिळाली असून, लोहा शहरातील स्वच्छता, दुकानांसमोरील बॅनर मुक्ती, सार्वजनिक शौचालय, जुन्या शहरात येणारे सिमेंट रस्ते, वाचनालयास स्पर्धा परीक्षेची पुस्तके असे विविध कामे केली जात आहेत. येत्या काळात अधिक विकास कामे शहरात होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री साफल्य बालाजी मंदिर परिसरात प्रवीण पाटील यांच्या हस्ते सिमेंट क्राँक्रिट रस्त्याच्या कामाचे रविवारी भूमिपूजन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष शरद पाटील, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली लोहा, कंधार मतदारसंघात विकासाला वेग आला असल्याचे नागरिकांनी सांगितले.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामांचा वैजापूर येथील माजी आ चिकटगावकर यांचे चिरंजीव युवा नेते अजय पाटील चिकटगावकर, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, हरिभाऊ चव्हाण, बांधकाम अभियंता शरद राहेरकर, नगरसेवक सदाशिव तेलंग, पार्वतीबाई जंगले, लक्ष्मी छत्रपती धुतमल, गणेश बगाडे, पूजा केतन खिल्लारे, सतीशकुमार निखाते, तुकाराम दाढेल, भागाबाई पवार, सुशिलादेवी परिहार, भास्कर पवार, रमाबाई मंजलवाड, अविनाश पवार, माधुरी राजेश बोडके, अनिता यलरवाड, ऋषी पाटील, सचिन मुकदम, भानुदास पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

## नांदेड विभागात तिकीट तपासणी मोहिमेत ३.४२ लाखांची वसुली

**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रवाशांनी वैध तिकिटांसह प्रवास करावा तसेच अनियमित प्रवासावर नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दि. २६ मार्च रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेवर सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमार सिंह यांनी देखरेख ठेवली.

या विशेष मोहिमेत २८ तिकीट तपासणी कर्मचारी सहभागी झाले असून विविध मार्गांवरील २५ गाड्यांची तपासणी करण्यात आली. या सखोल तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित प्रवास तसेच अनबुक्ड सामान यांची एकूण ५०० प्रकरणे आढळून आली असून त्यावर रेल्वे नियमांनुसार कारवाई करण्यात आली. यामध्ये ४४९ विनातिकीट प्रवास प्रकरणांमधून २ हजार १४ हजार ४१० रुपये भाडे व १ लाख १५ हजार १९० रुपये दंड वसूल करण्यात आला.

तसेच १५ अनियमित प्रवास प्रकरणांमधून ३ हजार ७३० भाडे व ३ हजार ७५० दंड वसूल करण्यात आला. याशिवाय ३६ अनबुक्ड लगेज प्रकरणांमधून ५ हजार ५०० रक्कम वसूल करण्यात आली. अशा प्रकारे या एकदिवसीय विशेष मोहिमेत ५०० प्रकरणांमधून एकूण ३ लाख ४२ हजार ५८० रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली. रेल्वे प्रशासन सर्व प्रवाशांना आवाहन करते की, त्यांनी नेहमी वैध तिकीटासहच प्रवास करावा. तसेच प्रवासादरम्यान सोबत असलेले सामान नियमानुसार बुक करावे. विनातिकीट किंवा अनियमित प्रवास करणे हे रेल्वे कायद्यांतर्गत दंडनीय अपराध असल्याचे म्हटले आहे.

## नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयात दिव्यांगांसाठी जनजागृती कार्यक्रम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –दिव्यांगांना समाजामध्ये सन्मानाची वागणूक मिळावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय नांदेड येथे शनिवार, दि. २८ मार्च रोजी शाईन विथ बिलिटी या शीर्षकाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वीणा पाटील या होत्या, तर कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. छाया पोटे यांनी काम पाहिले. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद, नांदेड येथील समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आवुलवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात



आवुलवार यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शासकीय योजना, सवलती आणि विविध संधींबाबत सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार आणि मार्गदर्शनपर सत्रांमधून महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.

कार्यक्रमास महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन उत्तम प्रकारे पार पडले. कार्यक्रमाच्या शेवटी नांदेडचे क्रीडा संचालक डॉ. चरणजीतसिंग यांनी आभार प्रदर्शन केले. महाविद्यालय प्रशासनाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## नगराध्यक्षा विश्रांतीताई कदम यांच्याकडून शहराला पाणीपुरवठ्यासाठी टँकरची भेट

**मुदखेड (प्रतिनिधी)** –मुदखेडच्या नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधवराव कदम यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधीलकी जोपासली आहे. शहरातील पाणीटंचाईची दाहकता लक्षात घेऊन त्यांनी स्वखर्चातून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.

रविवारी सकाळी ११ वाजता श्री कालीजी देवी मंदिर येथे नगराध्यक्षांनी सहकुटुंब देवीचे दर्शन घेतले. देवीची विधिवत पूजा केल्यानंतर टँकरचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी मंदिराच्या परिसरातून टँकरला हिरवा



झेंडा दाखवून शहरातील टंचाईग्रस्त भागांकडे रवाना करण्यात आले.

मुदखेड शहरात पाणी टंचाई नाही परंतु काही भागांत पाणीटंचाईची समस्या जाणवत होती. लग्नाच्या वाढदिवसावर विनाकारण खर्च करण्याऐवजी तो पैसा जनकल्याणासाठी वापरण्याचा निर्णय कदम कुटुंबाने घेतला. या उपक्रमांतर्गत शहरातील ज्या भागात पाण्याची तीव्र टंचाई आहे, तिथे आता मोफत पाणी पोहोचवले जाणार आहे.

लग्नाचा वाढदिवस हा आनंदाचा क्षण असतो, पण हा आनंद जेव्हा नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान पाहून द्विगुणीत होतो, तेव्हा त्याचे महत्त्व अधिक वाढते. शहराची सेवा करणे हेच आमचे प्रथम कर्तव्य असे नगराध्यक्षा सौ. विश्रांती माधवराव कदम यांनी सांगितले. यापूर्वीही मुदखेड भाजपचे शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, पाणीपुरवठा सभापती शाम चंद्रे यांनी सुध्दा स्वखर्चातून दोन टँकर घेऊन शहरात पाणी पुरवठा सुरळीत केला आहे.

## हनुमान जन्मोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** श्री शनिमंदिर व श्री संकट मोचन हनुमान मंदिर देवस्थान इंदिरा गांधी गृहनिर्माण सोसायटी, हडको नांदेड येथे हनुमान जन्मोत्सव निमित्ताने २ एप्रिल रोजी दही-दुधाचा महाअभिषेक, हनुमान चालीसा व श्री शनी चालीसा सामुदायिक वाचन, महाआरती व यजमान सत्कार व दुपारी महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे.

श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्ताने गुरुवार, दि. २ एप्रिल २६ रोजी श्री संकटमोचन हनुमान जयंती सोहळा निमित्ताने २ एप्रिल २६ रोजी गुरुवारी सकाळी ५.३० वा. दही-दुधाचा सामुदायीक महाअभिषेक, गुरु श्री शशिकांत महाराज यांच्या अधिपत्याखाली संपन्न होणार आहे. त्यानंतर हनुमान चालीसा व श्री शनि चालीसाचे वाचन, महाआरती, आजीवन यजमान श्री शिवसांब आनेराव, रंगनाथराव आष्टुरकर, करणसिंह ठाकूर, कै. सदाशिव बंडेवार, श्रीकांत शेषराव देशपांडे, गंगाधर नागनाथ चालीकवार यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

भावार्थ रामायण कथा शुक्रवार, दि. २५ मार्च ते १ एप्रिल दरम्यान वाचक सौ. शिवकला रमेशराव पाटील, सौ. आशाताई संजयराव जोशी तर सुचक विठ्ठलराव गिते व सुरेशराव कल्याण, भारत वडजे हे आहेत.

## सिडकोत आज २४ तास पाणीपुरवठा कामाचा शुभारंभ

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड वाघाळा शहर मनपाच्या हद्दीत प्रथमच सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्रमांक १९ कौठा येथे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेअंतर्गत नांदेड शहरात प्रथमच कौठा भागात २४ तास पाणीपुरवठा ही योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेचा शुभारंभ सोमवार, दिनांक ३० मार्च २६ रोजी सकाळी १० वाजता रविनगर कौठा येथे होणार असून, २४ तास नळाला पाणी योजनेचे उद्घाटन माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे.

केंद्र शासनाच्या अमृत २.० योजना अंतर्गत कौठा भागासाठी मंजूर झालेल्या नांदेड वाघाळा शहर महापालिका या कामासाठी २ कोटी ६६ लाख रुपये खर्च



केले आहेत. नांदेड शहरात पाच टप्प्यात हा प्रयोग केला जाणार आहे. कौठा भागातील हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर शहराला मिटरव्दारे पाणी पुरवठा देण्याची योजना असल्याचे समजते. रविनगर कौठा येथील जलकुंभ येथून पाणीपुरवठा कामाचा शुभारंभ माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण व मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा अभियंता सुमंत पाटील यांनी पाणीपुरवठा अधिकारी व कर्मचारी यांनी या कामी पुढाकार घेऊन हे काम तत्काळ केले आहे. या कामासाठी प्रभागातील लोकप्रतिनिधी यांनीही पुढाकार घेतला आहे. महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १९ मध्ये जवळपास १४१४ मालमत्ताधारकांना चौवीस तास पाणीपुरवठा होणार आहे. या सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सौ. अनुराधा काळे पाटील, श्रीमती सुलोचना धोडीबा काकडे, अभिषेक रमेश सौदे, सौ. दीपाली मोरे यांनी केले आहे.

## नांदेड येथे महसूल आयुक्तालय सुरू करण्यासह अन्य मागण्यांसाठी जनआंदोलनाचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी) –** मराठवाडा लोकविकास समन्वय संघर्ष समितीच्या मासिक बैठकीत नांदेड येथे महसूल आयुक्तालय तातडीने सुरू करावे, तसेच इतर प्रलंबित जनहिताच्या मागण्या पूर्ण कराव्यात, यासाठी एकमताने जनआंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बैठकीत नांदेड तहसील व महापालिकेचे विभाजन करून उत्तर व दक्षिण असे दोन स्वतंत्र प्रशासकीय कार्यालये स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली. या मागण्यांसंदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना नांदेड जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्याचे ठरविण्यात आले आहे. समितीने शासनाला १५ ऑगस्ट २०२६ पर्यंतचा अवधी दिला असून, त्यानंतर जनजागरण, धरणे व उपोषणासारख्या आंदोलनात्मक मार्गांचा अवलंब करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार मोठा असून, परभणी, हिंगोली व नांदेड या जिल्ह्यांतील नागरिकांना छोट्या-मोठ्या कामांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे जावे लागते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक व शारीरिक त्रास सहन करावा लागतो. तसेच नांदेड हे मुख्य रेल्वे मार्गावर असल्याने लातूर जिल्ह्यालाही यामध्ये सहज समाविष्ट करता येऊ शकते, असे समितीने नमूद केले आहे. तसेच मराठवाडा व विदर्भ विकास महामंडळाच्या मुदतवाढीचा प्रश्न दीर्घकाळ केंद्र व राज्य स्तरावर प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये असंतोष वाढत असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.



या मागण्यांवर समितीचे स्थायी सदस्य विजय जोशी, डी. एम. पाटील, माधव पाटील तरोडेकर, माणिक डहाळे, कमलाकर जोशी, जगन पांचाळ, कृष्णा उमरीकर, सखाराम कुलकर्णी, राजमल बाकलीवाल, शिवकांत स्वामी, एच. आर. पेद्देवाड, के. के. जांबकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. बैठकीस राजेश माने, शिवाजी कंठाळे, ज्ञानोबा वाघमारे, नारायण घोगरे, रामेश यन्नावार, रंगनाथ सरदेशपांडे, र. ब. दुडके यांसह अनेक कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. बैठकीचे अध्यक्षस्थान पु. गो. नाईक यांनी भूषविले. सूत्रसंचालन बंडोपंत कुंटूरकर यांनी केले, तर समितीचे मुख्य समन्वयक के. के. जांबकर यांनी प्रास्ताविकात समितीच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी महावितरण, महापालिका, जनआरोग्य अभियान तसेच शहर विकासाशी संबंधित प्रश्नांवरही चर्चा करण्यात आली. एप्रिल महिन्यात संबंधित विभागांनी नियमित आढावा बैठका घेऊन जनतेच्या मागण्यांवर कार्यवाही करावी, असा ठरावही संमत करण्यात आला.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com